|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ४३ सोमवार दि. ३ नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. ९ नोव्हेंबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## तिचे मन त्याला कधीच नाही कळले शुल्लक वादातून प्रेयसीला जिवंत जाळले

ठाणे : क्राईम रिपोर्टर

प्रेमात कधी काही होईल सांगता येत नाही. याचे कारण आजकालचे प्रेम हे केवळ तकलादू असते. त्यात शारीरिक आकर्षण आणि त्यातून मिळणारे लैंगिक सुख या पलीकडे काही नसते. त्यामुळे प्रेमाच्या नावाखाली एकत्र यायचे आणि मन भरले कि वेगळे व्हायचे असे प्रकार चालतात. त्यातच आजकालची वयात आलेली मुले शालेय जीवनापासूनच प्रेमात पडत. अशावेळी त्यांची कोवळी मने अत्यंत संवेदनशील असल्याने त्यांच्यात एखाद्या गोष्टीवरून वाद झाला कि मग त्यांच्या नात्यात दुरावा येतो. ठाण्यात ...पान २ वर

## महाराष्ट्रात ‘वासनांध’ लांडग्यांचा सुरु आहे मुक्त संचार भिवंडीत ६५ वर्षीय महिलेवर बलात्कार करून केले ठार

भिवंडी : अभिजीत हिरे



महाराष्ट्र सध्या महिलांसाठी सुरक्षित राहिलेला नाही. कारण ज्या प्रकारे महिलांवरील अत्याचाराच्या घटना समोर येत आहेत. त्या पाहता आता एकट्या दुकट्या महिलेने घराबाहेर पडायची सोया राहिलेली नाही. कारण वासनांध लांडगे नाक्यानाक्यावर महिलांची शिकार करण्यासाठी टपून बसलेले असतात. आणि ते इतके विकृत असतात कि त्यांच्यासाठी अल्पवयीन बालिका असो की वयस्कर महिला असो त्यांना कशाचीही तमा नसते त्यांना केवळ आपली पाशवी वासना भागवायची असते. दुर्दैवाने आपल्याकडे बलात्कार सारख्या गुन्ह्यासाठी कठोरात कठोर शिक्षा नाही. महिलांना जर कायद्याचे पुरेपूर संरक्षण असते तर महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडल्याचं नसत्या काही वर्षांपूर्वी मुंबईच्या महालक्ष्मी परिसरात असलेल्या शक्ती मिल कंपाऊंड मध्ये एका महिला पत्रकारावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. त्या घटनेनंतर महाराष्ट्रात भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याची सरकार दक्षता घेईल असे तत्कालीन गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी सांगितले होते. पण त्यानंतरही महाराष्ट्रात बलात्काराच्या घटना थांबलेल्या नाहीत. दुर्दैवाने अशा घटना रोखण्यासाठी सरकारने अजूनही आवश्यक ती पावले उचललेली नाहीत अशा घटना का घडतात, याबाबत सखोल संशोधन केलेले नाहीत त्याचबरोबर अशा घटनांमधील आरोपीना इतकी भयंकर शिक्षा होईल की भविष्यात कोणाचीही महिलांकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिम्मत होणार नाही असा कायदाही सरकारने केला नाही. दिल्लीतील निर्भया हत्याकांडानंतर संपूर्ण देश पेटून उठला होता. त्यानंतर सरकारने बलात्कार विरोधी कायद्यात काही थातुर मातुर सुधारणा केल्या, पण त्या पुरेशा नव्हत्या. त्यामुळेच बलात्काराच्या घटना थांबलेल्या नाहीत. भिवंडीत अशाच एका घटनेत एका ६५ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या महिलेवर सामूहिक बलात्कार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील आरोपी फरार आहेत.





भिवंडी तालुक्यातील चावेभरे या गावांमध्ये शेतावर गेलेल्या एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेवर सामूहिक बलात्कार करून नंतर दगडाने ठेचून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना चावे भरे गावात मंगळवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास उघडकीस आली आहे. मृतक पीडित वयोवृद्ध महिला आपल्या शेतावर गेली होती. त्यावेळी तिच्यावर शारीरिक अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्याचा प्रकार कुटुंबियांना समजल्यानंतर कुटुंबीयांनी शेतावर धाव घेतली. त्यावेळेस वृद्ध महिलाही निपचित पडली होती. कुटुंबीयांनी ही बाब स्थानिक गणेशपुरी पोलिसांना कळविल्यानंतर गणेशपुरी पोलीस ठाण्यात पथक घटनास्थळी दाखल होत त्यांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय या ठिकाणी आणला. गणेशपुरी पोलिसांसह ठाणे ग्रामीणचे अतिरिक्त पोलिस अधीक्षंक अभिनव मित्तल, उपविभागीय अधिक्षक राहुल झालटे यांनी घटनास्थळासह रुग्णालयाला भेट दिली. या तपासादरम्यान, मृत महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान मृतक वयोवृद्ध महिलेवर शारीरिक अत्याचार व हत्या केल्याप्रकरणी अज्ञात नराधमा विरोधात गुन्हा गणेशपुरी पोलीस ठाण्यात नोंद करून गांभीर्याने तपास सुरू केला आहे. विशेष म्हणजे ही हत्या केल्यानंतर मृत महिलेच्या गळ्यामध्ये असलेले सुमारे पाच ते सहा तोळे सोन्याचे दागिने ही चोरीला गेले ...पान २ वर

## अनैतिक संबंधावरील वाद प्राणावर बेतला पतीने रागात गरोदर पत्नीचा जीव घेतला



बारामती : क्राईम रिपोर्टर

काही लोकांना वाटते ज्यांचा प्रेमविवाह झालेला असतो त्यांनाच भविष्यात सुखाचा संसार होतो. पण प्रत्यक्षात तसे नसते. कारण प्रेमवीव्हनंतर प्रत्यक्ष वैवाहिक जीवनात पती पत्नी मधील प्रेम तिकतेचं असे नाही. कारण कधी पतीच्या तर कधी पत्नीच्या जीवनात तिसरी व्यक्ती येते आणि अनैतिक संबंध सुरु होतात ते जास्त दिवस लपून राहत नाहीत. अनैतिक संबंध जेंव्हा उघडकीस येतात तेंव्हा संसार तुटतो आणि त्यानंतर निर्माण झालेल्या सूडाच्या भावनेतून एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. बारामती येथे अशाच एका घटनेत पतीच्या अनैतिक संबंधाच्या संशयावरू झालेल्या वादात पतीने गरोदर पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पाटील अटक केली आहे.





इंदापूर–अहिल्यानगर रोडवरील मदनवाडी गावाच्या हद्दीत पुलाखाली गरोदर महिलेचा कुजलेला मृतदेह दोन दिवसांपूर्वी आढळला होता. तिच्या डाव्या हातावर रविराज असा टॅटू होता. त्यावरून २४ तासांत खुनाचा उलगडा करीत पोलिसांनी रविराज जाधव (रा. आष्टी, जि.बीड) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविराज प्रेमविवाह करून बारामती येथे पत्नी सोनालीसोबत राहत होता. दोघांत पत्नीच्या अनैतिक संबंधावरून वाद व्हायचा. १२ ऑक्टोबरला कडाक्याचे भांडण होऊन रविराजने सोनालीचा खून करून मृतदेह मदनवाडी गावाच्या हद्दीत ...पान २ वर

## उसने पैसे देणाऱ्याचा विश्वासघात केला चाळीस हजारांमुळे संगीताचा जीव गेला



पनवेल : क्राईम रिपोर्टर

आजकाल कुणाशीही पैशाचा व्यवहार करू नये. कारण उसने दिलेले पैसे काही लोक इमानदारीने परत करतात, तर काहींना मात्र घेतलेले पैसे बुडवायची व मदत करणाऱ्याला फसवायचे सवय असते आणि यात महिलाही मागे राहिलेल्या नाहीत. पनवेल जवळच्या कुंदेवाहूळ येथील संगीता म्हात्रे या महिलेने त्याच भागात राहणाऱ्या मोहम्मद अन्सारींकडून ४० हजार रुपये उसने घेतले होते, पण वारंवार आठवण करून देऊनही संगीता पैसे परत करीत नव्हती. त्यामुळे चिडलेल्या मोहम्मदने संतापाच्या भरात संगीताची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पनवेल कुंडेवहाळ गावातील ५५ वर्षीय संगिता नामदेव म्हात्रे यांचा गळा आवळून खून करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या महिला तपास पथकाने केवळ दोन दिवसांत अटक करून न्यायालयासमोर हजर केले. या तपासात महिला ...पान २ वर

## ऐन दिवाळीच्या दिवशी राडा झाला समाजसेवकाचा टपोऱ्यांनी गेम केला





जयसिंगपूर (कोल्हापुर) : क्राईम रिपोर्टर

आजकाल एखाद्या माणसाने सामाजिक भावनेतून दुसऱ्याला मदत केली तर काही लोकांना सहन होत नाही. ते अशा सामाजिक काम करणाऱ्या माणसावर डूख धरून असतात. जयसिंगपूर येथील अशाच एका घटनेत लोकांना यथाशक्ती मदत करणाऱ्या सुनील पाथरवट याच्यावर त्याच भागातील काही लोकांचा राग होता आणि ऐनदिवाळीच्या दिवशीच त्यांनी सुनीलवर प्राणघातक शास्त्रांनी वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

सुनिल किसन पाथरवट हा आपल्या कुटूंबासह नांदणी रस्त्यावरील १३व्या गल्लीत राहयला आहे. मुळता पाथरवट हे मोलमुजरी करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाहर करीत होते.तर कधी दगडाच्या खाणीमध्ये कामाला जात होता. जयसिंगपुर आणि नांदणी रस्त्यावर खाणी असल्याचे बरेच त्याच्या समाजातील लोक खाणीवर ही कामाला जात होते. काम कष्टाचे आणि धोक्याचे असल्याने काम संपवून बरेच जण दारू पिण्यासाठी बाहेर तर कधी गल्लीतच घोळका करून बसत होते. तर त्याच्या घरची परिस्थीती ही बेताचीच होती. सुनिल याला समाज सेवा करण्याची आवड ही होती. तो गल्लीतील अडल्या नडल्या लोकांची कामे करीत त्यांना मदत करीत होता. परंतु त्याचे हे काम त्याच्याच समाजातील काही लोकांना बघवत नव्हते. ते त्याला नावे ठेवत होते. कशाला लोकांची उसाभर ...पान २ वर

## इंस्टाग्रामवरील मैत्रीचा वाद विकोपाला गेला संतापलेल्या तरुणाने सहकाऱ्याचा खून केला

नागपूर : क्राईम रिपोर्टर

आजकाल तरुणाईमध्ये प्रेमाची क्रेझ आहे. प्रेमाच्या नावाखाली तरुण तरुणी एकत्र येतात अगोदर मैत्री आणि नंतर मैत्रीचे रूपांतर प्रेमात होते. पण कधी कधी एकाच तरुणीची दोघांची मैत्री असते. पण एकाच म्यानात दोन तलवारी राहू शकत नसल्याने मैत्रीच्या या त्रिकोणाचे प्रेमात रूपांतर होण्यापूर्वीच त्रिकोण फाटतो आणि त्यातून काहीही घडू शकते. नागपूर जवळच्या पार्डीमध्ये इंस्टाग्रामवरून झालेल्या मैत्रीवरून असाच वाद झाला आणि एका तरुणाने आपल्याच सहकाऱ्यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

मुलीशी मैत्रीवरून झालेल्या वादात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्याच एका सहकाऱ्याची हत्या केली. मृत व आरोपी हे अभियांत्रिकीचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. पारडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एचबी टाउन परिसरात ही घटना घडली असून यामुळे खळबळ उडाली आहे. नूर नवाज हुसेन (२२, सुभाननगर) असे मृताचे नाव आहे; तर हर्षल व के. बिसेन हे आरोपी आहेत. नूर आणि आरोपींमध्ये एका मुलीशी झालेल्या मैत्रीवरून वाद सुरू होता. त्यांच्यातील भांडण विकोपाला गेले होते. आरोपींनी समेट घडवून आणण्याच्या बहाण्याने शुक्रवारी रात्री १० वाजता नूरला एचबी टाऊन परिसरात बोलविले. तेथे त्यांच्यात बोलणे सुरू झाले व काही वेळातच वाद पेटला. आरोपींनी शिवीगाळ करत ...पान २ वर

## रोजच्या त्रासाने सहनशीलतेचा कडेलोट झाला भाजी विक्रेत्या भावांनी ज्ञानेश्वरचा खून केला

जळगाव : ललित खरे



एकाच परिसरात राहणाऱ्या व एकमेकांच्या सुखदुःखात मदत करणारे लोकांमध्ये खरे तर सलोखा असायला हवा. पण काही लोक छोट्या छोट्या गोष्टीवरून वाद घालीत असतात. जे शारीरिक आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम असतात ते कमजोर लोकांना सतत त्रास देत असतात. पण शेवटी माणसाच्या सहनशीलतेला मर्यादा असतात. या मर्यादा संपल्या कि माणूस मागचा विचार करीत नाही. जळगाव येथील कासारवाडीत राहणाऱ्या जयेश आणि योगेश या भाजी विक्रेत्या पाटील बंधूंच्या बाबतीत असेच झाले. त्यांच्या घरासमोरच रहाणाऱ्या आणि शरीराने मजबूत असलेल्या ज्ञानेश्वर पाटील हा नेहमी जयेश आणि योगेश या पाटील बांधून शिवीगाळ करायचा. त्यामुळे पाटील बंधूंच्या मनात राग होता. एके दिवशी त्यांच्या संतापाचा कडेलोट झाला आणि जयेश व योगेश यांनी चॉपरचे वार करून ज्ञानेश्वर याची भर रस्त्यात निर्घृण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.





जळगाव शहरातील कासमवाडी हा परिसर संमिश्र आणि श्रमिक लोकवस्तीचा परिसर समजला जातो. या भागात मजूर, विक्रेते, कष्टकरी नोकरदारया प्रकारात मोडणारा समाज वास्तव्याला आहे. या भागात जयेश पाटील आणि योगेश पाटील ही भावंडे आपल्या परिवारासह रहात होती. जळगाव शहराच्या सुभाष चौकातील बाजारात भाजीपाला विक्री करणे हा या दोघा भावंडाचा व्यवसाय होता. दररोज सकाळी बाजार समितीच्या लिलावातून भाजीपाला ...पान २ वर





## सासरच्यांनी टोकाचे पाऊल टाकले पूजाचा खून करून विहिरीत फेकले

नाशिक : क्राईम रिपोर्टर



सासरच्या मंडळींकडून हुंड्यासाठी विवाहितेचा नेहमीच छळवाद केला जातो. पण माहेरच्यांकडून पैसे आणून दिल्यानंतरही छळवाद काही थांबत नाही. चांदवडमध्ये राहणाऱ्या पूजाचा सासरच्यांकडून २ लाख रुपयांसाठी छळवाद सुरु होता. अखेर पूजाने माहेराहून २ लाख आणून दिले. त्यानंतरही छळवाद थांबला नाही पती तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करू लागला. सासरचे लोक मुलं होत नाही म्हणून छळू लागले. आणि एके दिवशी निमित्त करून सासरच्यांनी पूजाचा खून केला आणि मृतदेह विहिरीत फेकून अपघाती मृत्यू दाखवण्याचा प्रयत्न केला. पण पूजाच्या भावाच्या तक्रारीवरून पोलिसांनी पूजाच्या सासरच्या मंडळींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

नाशिक जिल्ह्यातील तालुक्याचे गाव असणाऱ्या चांदवड शहरात राधाकृष्ण वस्ती आहे. याठिकाणी कानमंडाळे शिवारात कैलास कचरू गवळी हे आपली पत्नी कांता, मुलगा अभिजीत, मुलगी श्रद्धा आणि वडील कचरू नामदेव गवळी यांच्यासमवेत रहातात. शेती करून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांना आणखी एक मुलगी असून तिचे नाव पूजा आहे. तिचा विवाह दि. २२ मे २०२३ रोजी बडगाव पंगू, ता. चांदवड गावात रहाणारा वैभव ...पान ६ वर

## बारमध्ये मारहाण करताच वेटर सुडाने पेटला बँक अधिकाऱ्याला ठार मारून बदला घेतला

इचलकरंजी : क्राईम रिपोर्टर



माणूस किती जरी मोठा असला तरी त्याने कुठेही आपला रुबाब दाखवू नये किंवा आपल्या मोठेपणाचे प्रदर्शन करू नये. पण काही लोकांना भलताच माज असतो. अशांपैकीच एक होता अभिनंदन. कोल्हापुरात तो बँक अधिकारी असल्याने सर्वत्र रुबाब दाखवायचा. बारमध्येही तो असेच करायचा. तिथल्या एका वेटरला रोज शिवीगाळ करायचा. एकदा तर त्याने वेटरला मारहाण केली. त्यामुळे वेटर भयंकर चिडला आणि एके दिवशी साथीदारांच्या मदतीने त्याने अभिनंदनाची दगडाने ठेचून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



अभिनंदन जयपाल कोल्हापुरे हे इचलकरंजी जवळील कबनुर येथील इंदिरा हौसिंग सोसायटीत कुटूंबासह राहयला आहेत. अभिनंदन कोल्हापुरे हे फेड बॅंक गोल्ड लोन शाखेत बॅंक व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते. त्याचा भाऊ अभिषेक कोल्हापुरे हे डॉक्टर म्हणून काम करतात. त्याचे आई वडिल हे निवृत शिक्षक असून त्याची पत्नी देखील इचलकरंजीतील नामवंत हायस्कुलमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्याच्या घरची परिस्थीती तशी सधन असल्याने कोणत्याचा गोष्टीची कमतरता नव्हती. अभिनंदन हे इचलकरंजी येथील इंदिरा हौसिंग सोसायटीत राहयला असल्याने ते कधी कधी ...पान ६ वर

पान १ वरून...

## महाराष्ट्रात 'वासनांध' लांडग्यांचा सुरू...

नसल्यामुळे ही हत्या चोरीच्या उद्देशाने नसून त्या महिलेवर अत्याचार करून केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. हत्येच्या घटने नंतर त्या परिसरातून तीन जणांना पलायन करताना काही जणांनी पाहिल्याचे माहिती हत्या झालेल्या वृद्ध महिलेच्या मुलाने दिली आहे. प्रथमदर्शनी पुरावे पाहता वृद्ध महिलेवर सामूहिक अत्याचार करून तिची केलेली हत्या ही अत्यंत निंदनीय घटना आहे. ही घटना समाजासाठी लज्जास्पद आहे. पोलिसांनी तत्काळ शारीरिक अत्याचार व हत्या केल्याचा गुन्हा दाखल करून आरोपींना कठोर शासन करावे'; अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वकील संघटनेचे अध्यक्ष अँड किरण चन्ने यांनी केला आहे.

## तिचे मन त्याला कधीच नाही कळले ...

अशाच एका घटनेत प्रेयसीबरोबर वाद झाल्याने अल्पवयीन प्रियकराने प्रेयसीला जिवंत जाळले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी प्रियकराला अटक करण्यात आली आहे. ठाण्यात काही दिवसांपूर्वी १७ वर्षीय मुलाने मैत्रिणीसोबत झालेल्या वादातून तिला पेटवून दिल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेत मुलगी ८० टक्के भाजली होती. त्या मुलीचा रुग्णालयात उपचारा दरम्यान बुधवारी मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलिसांनी १७ वर्षीय मुलावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली आहे. कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मृत १७ वर्षीय मुलगी तिच्या कुटुंबियांसह वास्तव्यास होती. या मुलीचा चेंबुर येथील तिच्या मित्रासोबर वाद झाला होता. या वादातून त्या अल्पवयीन मुलाने जिवंत सोडणार नाही असे मुलीला धमकावले होते. याप्रकरणानंतर मुलगी घाबरली होती. २४ ऑक्टोबरला मुलगी तिच्या ठाण्यातील घरामध्ये एकटी असताना, त्या अल्पवयीन मुलाने संधी साधून त्या मुलीला पेटवले. या घटनेत मुलगी ८० टक्के भाजली होती. तिच्यावर मुंबईतील केईम रुग्णालयात उपचार सुरु होते. याप्रकरणी कापूरवाबडी पोलिसांनी त्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले होते. परंतू, बुधवारी उपचारा दरम्यान त्या मुलीचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या मुलीच्या मृत्यूनंतर १७ वर्षीय मुलावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आणि त्याची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली. कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १७ वर्षीय मुलगी तिच्या कुटुंबियांसह वास्तव्यास होती. यापूर्वी ती मुंबईतील चेंबूर भागात कुटुंबासोबत वास्तव्यास होती. त्यावेळी तिची ओळख त्या भागात राहणाऱ्या एका मुलासोबत झाली होती. काही दिवसांपूर्वी मुलगी भाऊबीज निमित्ताने चेंबूर येथे गेली होती. त्यावेळी त्या मुलाने तिच्यासोबत वाद घालून तिला मारहाण केली. तिच्या नातेवाईकांना याबाबत माहिती मिळताच, तिच्या बचावासाठी ते गेले. त्यांनी त्या मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने तिला जीवंत सोडणार नाही असे धमकावले होते. याप्रकानंतर मुलगी खूप घाबरली होती. २४ ऑक्टोबरला मुलगी तिच्या ठाण्यातील घरामध्ये एकटी असताना अचानक त्यांच्या घरातून धूर येऊ लागला. या घटनेची माहिती परिसरातील नागरिकांनी तिच्या आईला दिली. मुलीचे कुटुंबीय घरामध्ये आले असता, तिचा मित्र घरामध्ये होता. तर, मुलगी भाजलेल्या अवस्थेत ओरडत होती. तिला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुलीच्या कुटुंबियांनी याचा जाब मुलाला विचारला असता, तो तेथून निघून गेला. अखेर मुलीच्या आईने कापूरबावडी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी मुलाला ताब्यात घेतले होते.

## उसने पैसे देणाऱ्याचा विश्वासघात केला...

पोलीस अधिकाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे महिला सक्षमीकरण आणि सबलीकरणाचा प्रेरणादायी संदेश मिळाल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी सांगितले. दिनांक २५ ऑक्टोबर रोजी सकाळी कुंडेवहाळ येथील घर क्रमांक ४७१ मध्ये संगिता म्हात्रे या महिलेचा गळा आवळून खून झाल्याची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तपासात महिलेचे सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे दिसून आले. त्यानुसार संगिता यांचा मुलगा सनी म्हात्रे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज किंवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने या खूनाचा तपास आव्हानात्मक होता. मात्र महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंढे, सारिका झांजुर्णे, पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे व पोलीस शिपाई विशाल दुधे यांच्या पथकाने परिसरातील ३० पेक्षा अधिक नागरिकांची चौकशी करून आरोपीपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. तपासादरम्यान संगीता यांच्या घरापासून काही अंतरावर राहणाऱ्या संशयीत आरोपी मोहम्मद समीर अल्लाउद्दीन अन्सारी (वय २३) याने मृत महिला संगिता यांना ४० हजार रुपये उसणे दिले होते. वारंवार पैसे मागूनही ती रक्कम परत न दिल्याने संतापातून संगीता यांचा गळा त्याने आवळून खून केल्याचे उघड झाले. या गुन्ह्याचा उलगडा करताना महिला पोलिसांनी केलेल्या काटेकोर तपासामुळे आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया त्यांनी स्वबळावर पूर्ण केली. ही कामगिरी पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सह आयुक्त संजय ऐनपुरे आणि उपायुक्त प्रशांत मोहीते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. महिला पोलिसांच्या या प्रयत्नांमुळे पनवेल पोलिसांच्या कार्यक्षमतेचा आणि महिला सक्षमीकरणाचा उत्तम नमुना सादर झाला आहे.

## ऐन दिवाळीच्या दिवशी राडा झाला...

करतोस तुला काही त्यात मिळणार आहे का? असे ते त्याला म्हणत होते. त्याच्या समाजातील त्याचे समवयस्क मित्र शेखर पाथरवट, विजय पाथरवट, रोहित पाथरवट, संजय पाथरवट आणि शिवानद पाथरवट सागर कलगुटगी यांना सुनिल याचे काम बघवत नव्हते.ते नेहमी सुनिल याच्याबरोबर कोणत्या ना कोणत्या कारणातून वाद घालत त्याच्याबरोबर भांडण काढत होते. बऱ्याच वेळेला त्याच्यांत भांडणे मारामारी होत होती. चार आठ दिवसातून गल्लीत त्याचा राडा होत होता. दारू पिऊन यायचे आणि एकमेकांच्या अंगावर जात एकमेकांना शिव्या देत मारामारी करीत बघुन घेण्याची भाषा करायचे हे त्याचे नित्याचेच झाले होते.त्यामुळे समाजातील अनेकांनी त्याची भांडणे मिटविण्याचा प्रयत्न केला. परंतु भांडणात कुणी कोणाचे ऐकत नव्हते. सुनिल ही हल्ली जास्तच दारू पित होता. दारू पिऊन आला की, तो गल्लीत उभा राहुन समोरच्याला बघुन घेण्याची भाषा करीत अर्वाच्च भाषेत शिव्या ही देत होता. तो नेमका कोणाला शिव्या देतो हे समाजातील शेखर पाथरवट, विजय पाथरवट संजय पाथरवट यांनी ओळखले होते. याला चांगलीच अद्दल घडवायला पाहिजे असा त्यांनी विचार केला. दारूच्या नशेत ते ही मग येवून गल्लीत राडा करीत होते. सुनिलकडे बघत तु काय गल्लीचा नेता आहेस काय? लई पुढे पुढे करतोस, तुला माज आलाय म्हणत त्याला चेतावणी देत होते. त्यातच मागे काही महिन्यापूर्वी एका महिलेच्या विषयावरून त्याची सुनिल पाथरवट याच्याबरोबर चांगलीच जुपंली होती. त्यावेळी शेखर पाथरवट आणि संजय पाथरवट यांनी सुनिल याला बेदम मारहाण करीत त्याला बघून घेण्याची भाषा करीत त्याला सज्जड दम दिला होता. तु त्या महिलेपासून चार हात लांब राह नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी ही त्यांनी सुनिल याला दिली होती. खरे तर या प्रकरणाशी सुनिल याचा काहीच संबंध नव्हता. परंतु तो गल्लीत नेहमी पुढे पुढे करतो म्हणून संजय पाथरवट आणि शेखर पाथरवट यांनी त्याला त्या प्रकरणात अडकविण्याचा खोटा प्रयत्न केला होता. ते प्रकरण समाजातील ज्येष्ट लोकांनी काही तर करन मिटवले होते. परंतु खरे तर ही वादळापूर्वीची शांतात होती. शेखर पाथरवट आणि त्याचे मित्र सुनिल पाथरवट याच्यावर चिडून होते. ह्यो गल्लीतील दादा व्हायला लागला. नेता होतोय व्हय असे म्हणत त्यालाच कुठे तरी अडकविण्याचा त्याचा विचार होता. तसे ते करीत ही होते. सुनिल ही काही कमीचा नव्हता. तो त्यांना पुरून उरेल असाच होता. दारूची नशा अंगात शिरली की, गल्लीत भांडणाला जोर चढत होता. त्यात एकमेकांच्या घरातील महिला ही पडत असल्याने कोण कोणाला मारहाण कशाने करतोय हे समजत नव्हते. एकदा दोनदा त्याची मारामारी पोलीस स्टेशनपर्यंत ही गेलेली होती.त्यावेळी परिस्थीतीचे गांर्भिय ओळखत पोलीसांनी वेळीच त्यात हस्तक्षेप करीत त्याची प्रकरण मिटवून समज दिलेली होती. परंतु त्यावेळी त्याची प्रकरणे तात्पुरती मिटलेली असायची परंतु एकमेकातील खुन्नस मात्र कायम असायची. खरे तर समाज सगळा एकच होता. परंतु सुनिल हा कोणत्या ही कामात पुढे पुढे करून नेता होण्याचा प्रयत्न करीत असल्याचे शेखर पाथरवट संजय पाथरवट विजय पाथरवट आणि समाजातील लोकांना आवडत ही नव्हते आणि पटत ही नव्हते. त्यामुळे त्यांनी सुनिल याच्या विरोधात काही ना काही करीत होते. समाजातील एकादी व्यक्ती जर पुढे चालली तर त्याला त्याच समाजातील लोक त्याच्या कामात आडकाठी घालून त्याचे पाय खेचत असतात हे बहुदा सगळीकडे पाहयला मिळते नेमकी हिच गोष्ट पाथरवट समाजात देखील होत होती. सुनिलच्या कामाने शेखर पाथरवट त्याचे मित्र जळत होते. सुनिल बरोबर काही तरी खुन्नस काढून ते नेहमी त्याच्याशी वाद घालीत भांडण उकरून काढत होते. हल्ली तर त्याची भांडणे विकोपाला गेली होती. शेखर आणि त्याचे मित्र सुनिल याला कायमचा धडा शिकवण्याचा प्लॅन करून ते तशी संधी शोधत होते. मंगळवार दि.२१ ऑक्टोंबर रोजी सगळीकडे लक्ष्मीपुजन दिवाळीचा धुमधडका सुरू होता.जयसिंगपुर शहरात ही लक्ष्मीपुजेनची तयार चालू होती गल्ली नंबर १३ मध्ये ही पाथरवट समाजात लक्ष्मी पुजेची तयारी सुरू होती, काही जण लक्ष्मीपुजा करून फटक्यांची आतषबाजी करीत होते.सुनिल पाथरवट ही पुजा आटोपून दारू पिऊन फटाके लावीत होता. त्याच वेळी तेथे शेखर पाथरवट, सागर कलगुटगी, विजय पाथरवट, रोहित पाथरवट, संजय पाथरवट दारूच्या नशेत आले. सुनिल याला फटाके फोडताना बघून त्याची तळपायांची आग मस्तकात गेली. आता काही तरी करून सुनिल बरोबर भांडण उकरून काढायचे असे त्यांनी ठरविले. फटाके फोडणाऱ्या सुनिलला त्यांनी तु कशाला रे पुढे पुढे करतोस म्हणत त्याच्याशी वाद घालत तु मुद्दामच आमच्या अंगावर फटाके फोडत आहेस म्हणत त्याच्याशी भांडण करायला सुरूवात केली.तो ही दारूच्या नशेत असल्याने त्याने त्यांना चांगलाच दम देत आला आहेस त्या रस्त्याने जावा नाही तरी त्याचे परिणाम गंभीर होतील असे म्हटले याचा राग संजय पाथरवट आणि रोहित पाथरवट यांना आला. अगोदरच ते सर्वजण दारूच्या नशेत असल्याने त्यांना आयतीच संधी चालून आली होती. त्यांनी सुनिल याला तु आम्हाला दादागिरी करतोस काय म्हणत त्याच्या अंगावर जात त्याला मारहाण करायला सुरूवात केली. त्याला मारहाण होत असताना त्याच्या घरातील महिला आणि पुरूष पळत आले.त्यांनी शेखर पाथरवट रोहित पाथरवट संजय पाथरवट यांना अडविण्याचा प्रयत्न केला. रात्री लक्ष्मीपुजनाचा कार्यक्रम अनेकांच्या घरात चालू होता तर पाथरवट समाजात राडा चालू झाला होता. या भांडणात दोन्ही कडच्या महिलांनी ही भाग घेतल्याने कोण कोणाला कशाने मारहाण करीत आहे हे समजत नव्हते. ओरडा ओरडी शिव्यांचा भडिमार चालू होता. सुनिलला ते खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत होते. त्यातच शेखर आणि संजय यांनी आपल्या कडील चाकू काढून सुनिल याच्या अंगावर सपासप वार केले. सुनिलच्या अंगावर धारदार चाकूने वार झाल्याने त्याच्या अंगातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. साला, ह्यो गल्लीचा नेता काय? याला जिंवत सोडू नका असे शेखर म्हणत होता म्हणून रोहितने परत सुनिलच्या अंगावर चाकूने वार केले. त्यावेळी काही महिला सुनिलच्या अंगावर पडून त्याला अडविण्याचा प्रयत्न करीत होत्या. ओक्साबोक्सी रडत शिव्या ही देत होत्या. सुनिलच्या पोटात, गळ्यावर, मानेवर आणि हातावर वार झाल्याने तो गंभीररित्या जखमी झाला होता. तो रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडला होता. त्याचेवर वार करून शेखर पाथरवट, संजय पाथरवट आणि त्याचे मित्र घटनास्थळावरून पळून गेले. गंभीर जखमी झालेल्या सुनिल याला काही जणांनी खाजगी वाहनातून जयसिंगपुर येथील दवाखान्यात नेले. तेथील डॉक्टरांनी त्याची अवस्था पाहून त्याला सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यास नातेवाईकांना सांगितले. सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्याला नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याचा उपचारापूर्वीच मृत्यु झाल्याचे नातेवाईकांना सांगितले. या घटनेची माहिती जयसिंगपुर पोलीसांना समजताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत या घटनेची माहिती घेतली. पो.निरी सत्यवान हाके आणि वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत या घटनेची माहिती घेत पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. या घटनेचा पंचनामा करून पोलीसांनी तपासाला सुरूवात केली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि या घटनेतील संशयीत आरोपी कोण आहेत याची माहिती पोलीसांना मिळाली होती. या घटनेतील संशयीत आरोपी पळून गेले होते. या घटनेचा तपास जयसिंगपुर पोलीसाबरोबर कोल्हापुर स्थानिक अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. दुसऱ्या दिवशी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांना या घटनेतील संशयीत आरोपी हे कोल्हापुर हायवे वरील चौंडेश्वरी पाटा आणि बसवान खिंडीत लपून बसल्याची माहिती मिळाली. बसवान खिंडीतून शेखर पाथरवट आणि सागर कलगुटगी यांना ताब्यात घेतले. तर विजय पाथरवट आणि संजय पाथरवट यांना चौडेश्वरी फाटयाजवळून ताब्यात घेण्यात आले. या घटनेतील आणखी दोघे रोहित पाथरवट आणि शिवानंद पाथरवट हे कथाशब्दबद्ध होईपर्यंत फरार होते. पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेची लेखी फिर्याद जयसिंगपुर पोलीसात मयत सुनिल पाथरवट याचा मित्र विशाल शिवाजी पवार यांने दिली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार जयसिंगपुर पोलीस ठाण्यात सुनिल किसन पाथरवट (वय ३१) याच्या खुन प्रकरणी शेखर महादेव पाथरवट (वय ३०), सागर परशुराम पाथरवट (वय ३१) विजय लक्ष्मण पाथरवट (वय ४३) आणि संजय लक्ष्मण पाथरवट (वय ४७) आणि इतर दोघे याच्या विरोधात भा.दं.वि. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी या चौघांना जयसिंगपुर येथील न्यायालयात दि.२३ ऑक्टोंबर रोजी उभे केले असता मा.न्यायालयाने या चौघांना ही २८ ऑक्टोंबरपर्यंतची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पोलीस कोठडी दरम्यान त्यांनी आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. दरम्यान पोलिसांनी संबंधीत संशयीत आरोपीकडून गुन्हयात वापरण्यात आलेला चाकु जप्त केला. या घटनेतील फरार आरोपीचा शोध पोलीस करीत असून या घटनेचा पुढील तपास जयसिंगपुर पोलीस स्टेशनचे पो.निरी.सत्यवान हाके याच्या मार्गदर्शनाखाली जयसिंगपुर पोलीस करीत आहेत.

## इंस्टाग्रामवरील मैत्रीचा वाद विकोपाला ...

नूरला घेरले व त्याला चाकूने भोसकले. यात नूर गंभीर जखमी झाला; तर आरोपी तेथून फरार झाले. या प्रकारामुळे घटनास्थळावर खळबळ उडाली. लोकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिस घटनास्थळी पोहोचले व नूरला तातडीने मेयो इस्पितळात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवत बिसेनला ताब्यात घेतले. इतर आरोपींचादेखील शोध सुरू आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मृत व आरोपी हे शहरातील नामांकित महाविद्यालयातील विद्यार्थी होते. त्यांच्यात सुरुवातीला चांगले संबंध होते; परंतु एका मुलीच्या मैत्रीवरून त्यात वितुष्ट आले होते.

## रोजच्या त्रासाने सहनशीलतेचा कडेलोट ...

विकत घ्यायचा आणि तो किरकोळ स्वरुपात बाजारात विक्री करणे हा जयेश आणि योगेश या दोघा भावंडांचा व्यवसाय होता. जयेश आणि योगेश हे दोघे भाऊ रहात असलेल्या घरासमोरच ज्ञानेश्वर पाटील हा तरुण आपल्या परिवारासह रहात होता. जयेश आणि योगेश तसेच ज्ञानेश्वर पाटील हे अमोरासमोर राहणारे एकमेकांचे नातेवाईक होते. मात्र दोघांच्या परिवारात नेहमी काही ना काही कारणावरुन वाद ठरलेले होते. कधी महिला महिलांमधे वाद होत तर कधी पुरुषांमधे तर कधी लहान मुलांमधे काहीतरी कारणावरुन वाद होत असत. अंगणात टाकलेले सांडपाणी अंगावर उडाले म्हणून वाद, अंगणात वाहन लावल्याने अडथळा झाला म्हणून वाद, गटारीच्या पाण्यावरुन वाद अशा स्वरुपाच्या लहान सहान कारणावरुन दोघा परिवारात वाद ठरलेले होते. दोघे परिवार एकमेकांच्या अमोरासमोर रहात होते. त्यामुळे पाटील परिवारामधे होणारे वाद नित्याचे झाले होते. ज्ञानेश्वर हा अंगकाठीने मजबुत होता. याउलट जयेश आणि योगेश हे दोघे भाऊ अंगकाठीने नाजुक होते. जयेश आणि योगेश हे दोघे भाऊ विस ते बाविस वयोगटातील अगदी कोवळ्या वयाची मुले होती. ज्ञानेश्वर हा अंगकाठीने मजबुत असल्याने व त्याच्या अंगी रग असल्यामुळे तो जयेश आणि योगेश या दोघा भावांवर नेहमी रुबाब करत होता. फक्त रुबाबच नव्हे तर तो त्यांना चार चौघात अश्लिल शिवीगाळ देखील करत होता. त्यामुळे या दोघा भावांच्यामनात ज्ञानेश्वरबद्दल राग होता. एकमेकांचे नातेवाईक असलेल्या दोघा पाटील कुटूंबातील वाद आणि त्या वादाची धुसफुस काही केल्या शमत नव्हती. त्यात ज्ञानेश्वर हा नेहमीच दांडगाई करत होता. कोवळ्या वयाची जयेश आणि योगेश ही दोघे भावंडे त्याची दांडगाई सहन करत होते. योगेशच्या बालपणापासून ज्ञानेश्वर त्याचा अपमान करत होता. गेल्या वर्षी सन २०२४ मधे योगेशचा विवाह झाला. कासमवाडी येथील राहत्या घरासमोरच मंडप टाकून योगेशचा विवाह संपन्न झाला होता. ज्ञानेश्वर हा विवाहीत योगेशचात्याच्या पत्नीसमोर देखील अपमान करत होता. आपल्या पत्नीसमोर ज्ञानेश्वरकडून होणारा अपमान योगेशच्या जिव्हारी लागत होता. तो योगेशला प्रसंगी घाणेरडी शिवीगाळ करत होता. आपल्या वहिणीसमोर आपल्या भावाचा ज्ञानेश्वरकडून होणारा अपमान जयेशला देखील आवडत नव्हता. दोघे भाऊ अंगकाठीने सडपातळ आणि कोवळ्या वयाचे असल्याचा ज्ञानेश्वर हा जणूकाही गैरफायदा घेत होता. त्यात त्याला मोठा आनंद मिळत होता. बालपणापासून ज्ञानेश्वरकडून होणाऱ्या अपमानाची धग योगेशच्या मनात पेटली होती. आता ती धग वणव्याच्या रुपात मोठी झाली होती. अपमानाच्या आगीचा मनात पेटलेला वणवा शांत करण्याचा योगेश विचार करत होता. दिवसेंदिवस त्याच्या मनातील बदल्याच्या भावनेचा विचार त्याला शांत बसू देत नव्हता. ज्ञानेश्वरचा बदला घेण्यासाठी योगेशच्या मनात सुडाची योजना आकार घेत होती. एके दिवशी त्याने एका ॲपवरुन ऑनलाईन चॉपर बुक केला. किचनमधे वापरली जाणारी सुरीदेखील ऑनलाईन मागवण्याची सुविधा आज उपलब्ध झाली आहे. घरात वापरली जाणारी सुरी अथवा चाकू हा आयटम वरवर घरगुती स्वरुपाचा दिसत असला तरी घातक शस्त्र म्हणून देखील वापरले गेले आहेत. घातक शस्त्र कुरीअरने मागवले जाण्याचे प्रकार कमी अधिक प्रमाणात वाढले आहेत. तलवारी देखील कुरिअरने मागवण्याचे प्रकार अनेक ठिकाणी उघडकीस आले आहेत. गुन्हेगारी वृत्तीचे लोक असे घातक शस्त्र घरगुती वापराच्या नावाखाली ऑनलाईन मागवत असल्याचे दिसून येते. चॉपर ऑनलाईन मागवण्याच्या विचाराने कोवळ्या वयातील योगेशच्या मनात आकार घेतला. त्याने एका ॲपवरुन तो बुक केला. त्या चॉपरचे पार्सल घेण्यासाठी तो संबंधीत कुरिअर कार्यालयात स्वत: गेला. अवघ्या साडे पाचशे रुपयात त्याने त्या चॉपरचे पार्सल सोडवले. ताब्यात घेतलेला चॉपर त्याने घरातील बेडच्या खाली लपवून ठेवला. योगेशचा भाऊ जयेश याने देखील ज्ञानेश्वरला संपवण्याचा विचार मनाशी केला होता. त्याने देखील योगेशच्या नकळत भंगार बाजारातून स्वस्तात एक चॉपर विकत घेतला होता. भंगार बाजारातून विकत घेतलेला चॉपर जयेशने तो वापरत असलेल्या स्कुटीच्या डिक्कीत लपवून ठेवला होता. अशा प्रकारे योगेश आणी जयेश हे दोघे भाऊ एकाच विचाराने आणि धैय्याने प्रेरीत होऊन कामाला लागले होते. ज्ञानेश्वरला संपवणे हे दोघांचे मिशन बनले होते. याचे दुसरे कारण म्हणजे ज्ञानेश्वरपासून आपल्या जीवीताला धोका पोहोचू शकतो याची दोघांच्या मनात एक अनामिक भिती देखील होती. दोघा भावांना ज्ञानेश्वरकडून होणारी शिवीगाळ आणि होणारा अपमान हा नेहमीचा भाग झाला होता. रावणाच्या प्रतिकृतीचे दहन करुन वाईट वृत्तीवर विजय मिळवण्यासाठी दसरा हा सण साजरा केला जातो. २ ऑक्टोबर २०२५ हा दसरा सणाचा दिवस उजाडला. या दिवशी ज्ञानेश्वरच्या रुपातील रावणाचा जयेश आणि योगेश या दोघा भावांच्या हातून अंत होण्याचे नियतीने लिहून ठेवले होते. या दिवशी नेहमीप्रमाणे योगेश बाजार समितीमधे लिलावात भाजीपाला विकत घेण्यासाठी गेला. मात्र या दिवशी बाजार समितीत भाजीपाला विक्रीसाठी आला नव्हता. त्यामुळे योगेशला रिकाम्या हाती परत यावे लागले. या दिवशी दोघे भाऊ घरीच होते. रात्री दहा वाजता योगेश हा परिसरातील दुर्गा मंडळाजवळ उभा होता. त्यावेळी त्याच्याजवळ ज्ञानेश्वर भिकन पाटील हा आला. आल्या आल्या त्याने योगेशला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवीगाळ सोबतच त्याने योगेशला जीवे ठार करण्याची धमकी दिली. दसरा हा सणाचा दिवस असतांना ज्ञानेश्वरकडून झालेली शिवीगाळ आणि धमकी ऐकून योगेशच्या मनाला दुख: झाले. तो संतापाच्या भरात घरी आला. उसळलेल्या समुद्राच्या लाटेप्रमाणे त्याच्या मनात संतापाची लाट उसळून आली. घरी आल्यानंतर त्याने घडलेला प्रकार भाऊ जयेशला कथन केला. बोलता बोलता त्याने बेडखाली लपवून ठेवलेला ऑनलाईन मागवलेला चॉपर बाहेर काढला. तो चॉपर स्कुटीच्या डिक्कीत ठेवत असतांना त्याला त्याठिकाणी अगोदरच एक चॉपर असल्याचे आढळून आले. तो चॉपर जयेशने भंगार बाजारातून विकत आणला होता. हा चॉपर कुणाचा आहे अशी योगेशने जयेशला विचारणा केली. त्यावर जयेशने योगेशला म्हटले की तुला काय करायचे तु फक्त चौकात चल आज ज्ञानेश्वरला सोडायचे नाही. दोन्ही चॉपर स्कुटीच्या डिक्कीत ठेवल्यानंतर दोघे भाऊ स्कुटीने दुर्गा देवी स्थापन झालेल्या मंडळानजीक चौकात आले. त्यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते. योगेश आणि जयेश हे दोघे भाऊ चौकात स्कुटीजवळ उभे असतांना पलीकडून ज्ञानेश्वर आला. आल्या आल्या त्याने दोघा भावांना बघून शिवीगाळ सुरु केली. आज दसऱ्याच्या रात्री रावणरुपी ज्ञानेश्वरचा खात्मा करायचा असे मनाशी निश्चित करुनच दोघे भाऊ चौकात आले होते. त्याचीच वाट बघणाऱ्या दोघा भावांच्या दिशेने ज्ञानेश्वर दुर्दैवाने आला. त्याने शिवीगाळ केल्याने दोघा भावांच्या मनातील संतापाची लाट अजूनच उसळली. ज्ञानेश्वरला काही कळण्याच्या आत दोघा भावांनी स्कुटीच्या डिक्कीतून आपापले चॉपर बाहेर काढले. योगेशने ज्ञानेश्वरच्या पोटावर चॉपरने जीवघेणा हल्ला केला. जयेशने ज्ञानेश्वरच्या मांडीवर हल्ला केला. पोटावर आणि मांडीवर प्राणघातक हल्ला झाल्याने ज्ञानेश्वरला पळणे कठीण झाले. अनपेक्षीतपणे झालेल्या हल्ल्यात ज्ञानेश्वर रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर कोसळला. या घटनेच्या वेळी तेथून आपल्या पत्नीसह घरी जात असलेले जखमी ज्ञानेश्वरचे नातेवाईक शालिक सुधाकर पाटील यांनी दोघा हल्लेखोर भावांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र ते पळून जाण्यात यशस्वी झाले. उपस्थित जमावातील काही जणांसह शालिक पाटील यांनी जखमी ज्ञानेश्वरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मयत घोषित केले. या खूनी हल्ल्याची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरली. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक बबन आव्हाड व त्यांचे सहकारी सहायक पोलिस निरीक्षक गणेश वाघ, हे.कॉ. प्रमोद लाडवंजारी, किरण चौधरी, गणेश शिरसाळे, पो.कॉ. राहुल पाटील आदींनी घटनास्थळ व रुग्णालय गाठले. मयत ज्ञानेश्वरच्या नातेवाईकांसह मित्रांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी केली. संतापाच्या भरात ज्ञानेश्वरला जखमी केल्यानंतर योगेश घरी पळून गेला. त्याने त्याचे कपडे आणि चॉपर घरातील कोठीमधे लपवले. अंगावरील कपडे बदलून तो अजिंठा चौकात गेला. तेथून एका धावत्या वाहनाला हात दाखवून त्याने ते थांबवले. त्या वाहनात बसून त्याने नशिराबाद गाठले. नशिराबाद येथील एका हॉटेलवर योगेश बसून राहीला. दरम्यान एलसीबी पथकाने फरार योगेशचे मोबाईल लोकेशन ट्रेस करत त्याला नशिराबाद येथून ताब्यात घेतले. दरम्यानच्या कालावधीत स्कुटीने पळून गेलेल्या जयेशने भुसावळ गाठले. रक्ताने माखलेले हत्यार स्कुटीच्या डिक्कीत ठेवून जयेशने ती स्कुटी भुसावळ रेल्वे स्टेशनच्या बाहेर उभी केली आणि रेल्वेने नाशिक गाठले. नाशिकला गेल्यानंतर त्याने त्याच्या एका नातेवाईकासोबत संपर्क साधला. मात्र त्या जवळचय नातेवाईकाने त्याला भेटण्यास आणि पुन्हा फोन लावण्यास नकार दिला. जवळच्या नातेवाईकाकडून मदत न मिळाल्याने हताश झालेला जयेश पाटील ३ ऑक्टोबर रोजी सकाळी रेल्वेने भुसावळला परत आला. भुसावळ रेल्वे स्टेशनच्या बाहेर बसणाऱ्या लोकांकडून त्याने कपडे घेतले आणि ते परिधान केले. गुन्हा करतांना वापरलेले कपडे जयेशने स्कुटीच्या डिक्कीत ठेवून दिले. भुसावळ शहरात जयेशचे कुणी ओळखीचे नव्हते आणि त्याला अजून पळून जाण्यासाठी पैशांची गरज होती. त्यामुळे मिळेल त्या पैशात स्कुटी विक्री करण्याचे त्याने ठरवले. त्यामुळे तो स्कुटीने जळगावच्या अजिंठा चौकात आला. त्याठिकाणी एका झाडाखाली त्याने स्कुटी उभी केली. स्कुटीवर फिरल्यास स्कुटीचा क्रमांक बघून पोलिस आपल्याला पकडून घेतील या विचाराने त्याने स्कुटीची चावी फुट मॅटखाली लपवून ठेवली आणि विचार करु लागला. स्कुटीचा कुणी खरेदीदार मिळाला तर त्याला स्कुटीची चावी फुट मॅटखाली असल्याचे सांगून मिळालेले पैसे घेऊन पळून जाण्याचे त्याने मनाशी ठरवले होते. मात्र त्याचवेळी त्याच्या मागावर असलेल्या एमआयडीसी पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने त्याला तांत्रीक तपासाच्या मदतीने ताब्यात घेतले. त्यामुळे त्याचे पळून जाण्याचे नियोजन फसले. ताब्यातील जयेशला एमआयडीसी पोलिस स्टेशनला आणले गेले. ज्ञानेश्वर पाटील याच्या खून प्रकरणी शालिक सुधाकर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एमआयडीसी पोलिस स्टेशनला जयेश पाटील आणि योगेश पाटील या दोघा भावांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.न. ७०६/२०२५ भारतीय न्याय संहिता १०३,३५२, ३५१(२), ३०५प्रमाणेहा गुन्हा नोंद करण्यात आला. जयेश आणि योगेश या दोघा भावांना अटक करण्यात आली. संशयीत आरोपीच्या पिंजऱ्यात असलेले दोघे भावंड सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक गणेश वाघ करत आहेत. त्यांना हे.कॉ. प्रमोद लाडवंजारी, किरण चौधरी, गणेश शिरसाळे, पो.कॉ. राहुल पाटील आदींचे सहकार्य लाभत आहे.

## अनैतिक संबंधावरील वाद प्राणावर ...

पुलाखाली पाण्यात फेकून दिला. दोन दिवसांपूर्वी भिगवण पोलीस स्टेशन हद्दीतील मदनवाडी गावाजवळ ओढ्याच्या पुलाखाली दोन दिवसांपूर्वी एका गरोदर महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह सापडल्यानं खळबळ उडाली होती. पोलीस तपासानुसार, दिपाली सुदर्शन जाधव (३०) हिचा विवाहबाह्य प्रेमसंबंध असल्याचा संशय पतीला होता. त्यावरून १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी घरगुती वाद झाला आणि रागात आरोपी पती सुदर्शन ऊर्फ रविराज रणजित जाधव (वय ३६) याने पत्नीच्या डोक्यात लोखंडी वस्तूने प्राणघातक हल्ला करून तिचा खून केला. खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपीने पत्नीचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळून त्याच्या ज्युपिटर दुचाकीवर ठेवला आणि तो मृतदेह भिगवण–बारामती रस्त्यावरील मदनवाडी गावाजवळील ओढ्याच्या पुलाखाली फेकून दिला. २२ ऑक्टोबर रोजी स्थानिक पोलीस पाटलांनी पुलाखाली ब्लँकेटमध्ये बांधलेला मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना दिली. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत होता आणि डोक्याची कवटी फुटलेली होती. मात्र, हातावर रविराज ठरींळीरक्ष' असा टॅटू असल्यानं पोलिसांनी त्यावरून ओळख पटवण्यात मदत मिळाली. भिगवण पोलीस स्टेशन आणि पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त तपास सुरू केला. तपासाच्या दरम्यान आरोपी सुदर्शन ऊर्फ रविराज रणजित जाधव याने पत्नी बेपत्ता असल्याची तक्रार १२ ऑक्टोबर रोजी बारामती पोलीस स्टेशनला दिली होती. परंतु चौकशीत त्याच्या उत्तरात विसंगती आढळल्यानं पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली. शेवटी सुदर्शनने पत्नीचा खून केल्याची कबुली दिली.

# बोईसरमध्ये सराफा दुकानावर गोळीबार



**बोईसर : वार्ताहर**

बोईसरमध्ये दरोडा टाकण्याच्या इराद्याने आलेल्या चोरट्यानी सराफा दुकानावर गोळीबार केल्याची खळबळजनक घटना घडली. या गोळीबारात सराफा दुकानदार सुदैवाने बचावला असून घटनास्थळी पोचलेला पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. बोईसरच्या गणेश नगर परिसरात असलेल्या चतुर्भुज ज्वेलर्स या सराफा दुकानावर शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या अज्ञात चोरट्यानी भर दिवसा गोळीबार केला. दरोडा टाकण्याच्या इराद्याने आलेल्या चोरट्यानी सराफा दुकानदाराच्या दिशेने पिस्तुलातून दोन गोळ्या झाडल्या. मात्र त्यांचा नेम चुकल्याने या हल्ल्यातून दुकानदार सुदैवाने बचावला. यानंतर घाबरलेल्या अज्ञात चोरट्यानी पिस्तूल घटनास्थळी टाकून पळ काढला. गोळीबाराच्या घटनेची माहिती मिळताच बोईसर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी पिस्तूल ताब्यात घेत पसार झालेल्या चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

# १७ मुलांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्याचा पोलिसांकडून एन्काऊंटर

**मुंबई : वार्ताहर**

मुंबईच्या पवई भागातील आरए स्टुडीओमध्ये तब्बल १७ मुलांना ओलीस ठेवल्याचा प्रकार आज (३० ऑक्टोबर) दुपारी उघडकीस आला होता. आरोपी रोहित आर्याने व्हिडीओ जारी करताना माझी मागणी मान्य झाली नाही तर या ठिकाणाला मी आग लावून टाकेल, अशी धमकी दिली होती. त्यामुळे मुंबई पोलिसांनी रोहित आर्याला बोलण्यात गुंतवून स्टुडीओच्या बाथरूममधून आतमध्ये प्रवेश केला आणि सर्व मुलांची सुखरूप सुटका केली. मात्र स्टुडीओत प्रवेश केल्यानंतर पोलीस आणि रोहित आर्या यांच्यात झटापट झाली. यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रोहित आर्या जखमी झाला होता. अशातच आता रोहित आर्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. आरोपी रोहित आर्या याने काही मुलांना वेब-सिरीजसाठी ऑडीशन आणि वर्कशॉप घेण्यासाठी काही मुलांना पवई येथील आरए स्टुडीओत बोलावलं होतं. गेल्या ६ दिवसांपासून मुलांचे ऑडीशन सुरू होते. मात्र आज मुले जेवणासाठी बाहेर न आल्याने त्यांना ओलीस ठेवल्याच प्रकार समोर आला. मुले स्टुडिओच्या खिडक्यांमधून बाहेर डोकावताना दिसली. सर्व मुले १५ वर्षांखालील होती. धक्कादायक म्हणजे आरोपी रोहित आर्या याने व्हिडीओ जारी करताना म्हटले होते की, मला काही लोकांना प्रश्न विचारायाचे आहे. मी काही टेररिस्ट नाही. माझी पैशांची मागणी नाही. माझी मागणी फक्त काही लोकांशी बोलण्याची आहे. माझी मागणी मान्य झाली नाही, तर या ठिकाणाला मी आग लावून टाकेल. यासाठी मी जबाबदार राहणार नाही. माझी काही लोकांशी चर्चा झाली तर मी स्वतः बाहेर येईल. मला कोणतीही दुखापत झाली नाही पाहिजे. मी एकटा नाही, अशी धमकी रोहित आर्या याने दिली होती. पोलिसांनी आरोपी रोहित आर्याला बोलण्यात गुंतवून स्टुडीओच्या बाथरूममधून आतमध्ये प्रवेश केला. यावेळी झालेल्या झटापटीत पोलिसांनी रोहित आर्यावर गोळीबार केला आणि सर्व मुलांनी सुखरुप सुटका केली. त्यानंतर रोहित आर्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यासंदर्भात माहिती देताना सह पोलीस आयुक्त कायदा आणि सुव्यवस्था सत्यनारायण चौधरी यांनी सांगितले की, सर्व मुलांची सुखरुप सुटका करण्यात आली आहे. तसेच रोहित आर्याकडे एअर गन होती आणि त्याच्याकडे काही केमिकलही सापडले आहेत. आतमध्ये एकूण १९ जण होते. यामध्ये एक वरिष्ठ नागरिक तसेच दोन स्थानिकांचा समावेश होता. रोहित आर्याने संबधित मुलांना एका वेब-सिरीजसाठी ऑडीशनसाठी बोलावले होते. त्यामुळे मुलांची सुखरूप सुटका होणे, जे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. त्यांच्याशी बोलून इतर काही पोलिसांनी बाथरूममधून आतमध्ये प्रवेश केला. त्यानंतर सर्व मुलांची सुखरूप सुटका करण्यात आली, अशी माहिती सत्यनारायण चौधरी यांनी दिली. दरम्यान, स्टुडीओमध्ये झालेल्या चकमकीत पोलिसांनी रोहित आर्यावर गोळीबार केला. यावेळी रोहित आर्याच्या छातीला गोळी लागली. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेत तत्काळ रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान रोहित आर्याचा मृत्यू झाला. पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांनी रोहित आर्यावर गोळीबार केला. मात्र आज घडलेल्या घटनेने मुंबई हादरली आहे.

### कोण आहे रोहित आर्य!

रोहित आर्यच्या या कृत्यामागे नेमकं काय कारण आहे, याचा सखोल तपास केला जात आहे. तत्पूर्वी रोहितने व्हिडिओ बनवत स्वत:बद्दल माहिती दिली होती. मी दहशतवादी नाही. माझी पैशाची मागणी केलेली नाही. अनेक प्रयत्न झाले. अनेकांना अनेकवेळा भेटून झाले. १ मे पासून साधे उपोषण करून देखील अजून आज/उमुंद्या असेच होत आहे. त्यामुळे, आजपासून मी तीव्र उपोषण सुरु केले. आता, पाणी सुद्धा घेणार नाही. गांभीर्य समजून घेतले तर बरे होईल, नाही समजले तर जय श्री राम असं किडनॅपर रोहित आर्यने व्हिडिओच्या माध्यमातून सांगितलं. त्यानंतर, पोलिसांसह सुरक्षा जवानांनी गतीमानतेन चक्र फिरवत रोहित आर्यला ताब्यात घेतलं.




रोहित आर्य हा मुंबई पवई परिसरात एक्टींग क्लासेस आणि ऑडिशनसंदर्भातील काम करतो. सोशल मीडियावर तो आपली ओळख फिल्म मेकर आणि मोटीव्हेशन स्पीकर अशी सांगतो. 'अप्सरा' नावाने त्याचे युट्यूब चॅनेल आहे. गेल्या काही दिवसांपासून तो मानसिक तणावात असून आपल्यावर सरकारकडून अन्याय होत असल्याचं त्याचं म्हणणं आहे. रोहित आर्य मागील काही दिवसांपूर्वी उपोषणाला बसला होता, सरकारकडे त्याचे पैसे आहेत, त्याने लोन काढून शिक्षण विभागासाठी एक प्रोजेक्ट केला होता. स्वच्छता मॉनिटरसंदर्भातील या प्रोजेक्टसाठी त्याचे पैसे लागले असून सरकारने त्याचे पैसे न दिल्याने कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचं त्यांचं म्हणणं आहे. याप्रकरणी, पोलीस अधिक तपास करत आहेत. पवईच्या महावीर क्लासिक बिल्डिंगमील ठअ स्टूडिओमध्ये गेल्या ५-६ दिवसांपासून सिनेमा, वेब सीरीजसाठी कास्टिंग केले जात होते. त्यासाठी, १७ जणांचे फाइनल कास्टिंग झाले. त्यामुळेच, येथील स्टुडिओत आज १७ मुले आणि दोन पालक उपस्थित होते. दुपारी जेवणाच्या वेळेत ही मुले स्टुडिओतून बाहेर गेल्यानंतर पालक चिंतेत होते. कारण, ही मुले काचेतून आपला हात दाखवत इशारा करत होती. दरम्यान, घटनास्थळी पोलीस आल्यानंतरच हा किडनॅपिंगचा प्रकार असल्याचे उघडकीस आले.

# देवणीत जंगली लांडग्याच्या हल्लात सहाजण गंभीर जखमी





**देवणी : शकील मनियार**

देवणी येथे शुक्रवारी पंचायत समिती परिसरात विषारी लांडगा या प्राण्याने पाच ते सहा जणांना जबर चावा घेऊन गंभीर जखमी केले आहे. तसेच शनिवार रोजी सकाळच्या दरम्यान वॉकिंगसाठी गेलेल्या महिलेसह चार नागरिकांवर देवणी खु व बोरोळ रोडवर बऱ्याच लोकांवर हल्ला करून जखमी केले. तसेच सकाळच्या दरम्यान बोरोळ रोडवर एका वाहनास जबरीची धडक बसल्याने लांडगा हा प्राणी जागीच ठार झाला. दरम्यान शुक्रवारी व शनिवारी हल्ला केलेल्या अनेक जखमीना उपचारासाठी देवणी येथे सिरम लस उपलब्ध नसल्याने उदगीर येथे शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सदर हिंस्र प्राणी शंभर टक्के लांडगा असल्याचे वन अधिकारी घोगरे यांनी सांगतीले आहे.

याबाबत अधिक माहिती असे की शुक्रवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास पंचायत समिती परिसरात युनूस सरदार मिया मिर्झा बे (वय ५५ वर्ष) यास जबर जखमी केले.. यानंतर त्याच परिसरात तीन वर्षाची मुलगी इनाया इस्माईल मल्लेवाले हिच्यावर हमला केला. यानंतर तेथून तो देव नदीच्या किनारी भ्रमण करीत फैजान फिरोज येरोळे या नववर्षाच्या मुलावर हल्ला करून जखमी केले. यानंतर तेथून तो देव नदीच्या पलिकडे शेतीवर जाऊन तेथे चन्नप्पा राजप्पा भद्रशेट्टे (वय ५५ वर्ष) यांना जबर जखमी केले. यानंतर तेथून तो पुढे मार्गस्थ होऊन कोतवाल यांच्या शेती जवळ असलेल्या गोविंद माणिकराव म्हेत्रे (वय ५५ वर्षे) यांना घायाळ करून तेथून तो पुढे शेतशिवाराने निघून गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी देवणी खू रोड व बारोळ रोडवरती काही महिला सकाळी मॉर्निंगवॉकसाठी गेल्या असता वर्षा रवींद्र राठोड या महिलेसह अन्य चार नागरिकांवर हल्ला करून जखमी केले. त्यानंतर सकाळी दहा आकाराच्या दरम्यान बोरोळ रोड वरती एका वाहनास धडक बसल्याने विषारी लांडगा हा प्राणी जागीच ठार झाल्याने वन विभागाने त्यास ताब्यात घेऊन पीएम करण्यासाठी घेऊन गेले. लांडगा हा प्राणी मरण पावल्याने देवणीवासीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. हा हिंस्र प्राणी लांडगाच असेल पीएम रिपोर्टद्वारे स्पष्ट होईल असे वनअधिकारी घोगरे यांनी 'क्राईम संध्या'शी बोलताना सांगितले.

# सामाजिक परिवर्तनाचा वारसा समृद्ध करु या -डॉ.मृणालिनी फडणवीस

**जळगाव : क्राईम रिपोर्टर**

मानवी जीवन अर्थपूर्ण करण्यासाठी महात्मा गांधींसह अनेक महापुरुषांनी निवडलेला सामाजिक परिवर्तनाचा वारसा पुढे चालू ठेवण्याची जबाबदारी आजच्या तरुणांची आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशन आयोजित नॅशनल गांधीयन लीडरशिप कॅम्पमध्ये देशभरातून आलेल्या तरुणांनी हा वारसा समृद्ध करावा अशी अपेक्षा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठाच्या माजी कुलगुरु व खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण संचालिका डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी व्यक्त केली. वाकोद येथील गौराई कृषी फार्म येथे आजपासून सुरु झालेल्या नॅशनल गांधीयन लीडरशिपच्या उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर गांधी रिसर्च फाऊंडेशनचे विश्वस्त डॉ. सुदर्शन अयंगार, रिसर्च डीन डॉ. गीता धर्मपाल, ज्येष्ठ गांधीयन अब्दुलभाई, व्यवस्थापक विनोदसिंह राजपूत, प्राचार्य देवेंद्र चौधरी, समन्वयक उदय महाजन व अॅकॅडेमिक डीन डॉ. अश्विन झाला उपस्थित होते. आपल्या मनोगतात डॉ. फडणवीस पुढे म्हणाल्या आपल्याला पडणारे प्रश्न आपण खुलेपणाने विचारले पाहिजे, चिंतन केले पाहिजे. आजच्या पिढीला आवश्यक असलेला संयम, श्रद्धा, आसक्ती या गोष्टी गांधीजींच्या जीवनातून शिकायला मिळतील.



तंत्रज्ञानाच्या नवनवीन अविष्कारांना स्वीकारतांना योग्य नियंत्रण हवे. शाश्वत विकासाचा विचार करतांना आपण योग्य गोष्टी आत्मसात केल्या पाहिजे व त्याच समाजापर्यंत पोहोचतील. प्लास्टिकचा वापर, श्रम प्रतिष्ठा यासारख्या गोष्टी आपल्या जीवनाला आकार देतील व त्यातूनच आदर्श व्यक्तिमत्वे घडतील असेही त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत विविध प्रांतातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. क्षेत्र अधिकारी प्रशांत चौधरी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी साबरमती के संत तुने कर दिया कमाल हे गीत सादर केले. डॉ. गीता धर्मपाल यांनी प्रास्ताविकातून अशा प्रकारच्या शिबिरांची आवश्यकता व त्यामागील गांधी रिसर्च फाऊंडेशनची भूमिका मांडली. अब्दुलभाईंनी विद्यार्थ्यांना शिबिरातील सहभागीकडून असलेल्या अपेक्षा सांगितल्या. अध्यक्षीय समारोपात डॉ. सुदर्शन अयंगार यांनी हे शिबीर ग्रामीण भागात करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. या शिबिरात आपण युवा गांधीजींना समजून घेणार आहोत. ज्यांनी आपल्या जीवनात समाज परिवर्तनाचे कार्य करीत संपूर्ण देशाला एकत्रित बांधून स्वतंत्रता आंदोलनात प्रमुख भूमिका बजावली. डॉ. अश्विन झाला यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर दीपक मिश्रा यांनी आभार मानले. राष्ट्रीताने कार्यक्रमाची सांगता झाली. शिबिरात १६ राज्यातील ५४ युवक-युवतींचा सहभाग आहे. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते व शिबिरार्थींच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. दि. ९ नोव्हेंबर पर्यंत चालणाऱ्या या शिबिरात विविध सत्रांसह, श्रमदान, जनजागृती आदी कार्यक्रम होणार आहे. तसेच अजिंठा व जैन इरिगेशनच्या विविध प्रकल्पांना भेट देण्यात येणार आहे.

## भिवंडीतील खावडा टॉवर लाईन विद्युत लाईन संदर्भात शेतकरी कृती समितीकडून आंदोलन इशारा



**भिवंडी : वार्ताहर**

ठाणे-पालघर जिल्हायातून खावडा टावर ही विद्युत लाईन जात असल्याने शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळावा यासाठी भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतकरी संघर्ष समिती स्थापन करून भिवंडी प्रांत अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदणाद्वारे शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळण्याकामी वारंवार मागणी करून ही शेताकऱ्यांना योग्य तो न्याय मिळत नसल्याने भिवंडी तालुक्यातील कृती समितीने तीव्र आंदोलनाचा पावित्र्या घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना ३३०० स्क्वेअर मीटरचा भाव जाहीर झाल्याने सदर भाव हा कोणत्याही शेतकऱ्यांना मान्य नसल्याने, हा भाव शेतकऱ्यांवर जबरदस्तीने लादल्याचा आरोप करत लवकरच शेतकरी कृती समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समन्वयक भगवान सांबरे यांनी दिला आहे.

## शिवसेना ठाकरे गटाकडून भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत अन्न धान्य साहित्य वितरण



**भिवंडी : वार्ताहर**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भिवंडी ग्रामीण विधानसभा प्रमुख महादेव आंबो घाटाळ यांच्या वतीने भिवंडी तालुक्यातील मोहंडूळ, पांढरीपाडा कुडवाल पाडा ठाकूरपाडा ढोकाल पाडा भिनार येथील २०० ज्येष्ठ नागरिकांना व विधवा निराधार महिलांना मोफत अन्न धान्य साहित्याचे वितरण बुधवारी भिनार येथे करण्यात आले. महादेव घाटाळ, श्रमिक मोर्चा ठाणे जिल्हा अध्यक्ष मंदार घाणेकर, मोहंडूळ ग्राम पंचायत सरपंच बळीराम केशव भिनार ग्राम पंचायत सरपंच भरत घाटाळ व इतर उपस्थित होते. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वीस टक्के राजकारण व ऐंशी टक्के समाजकारण हे शिवसेनेचे ब्रीद अंगिकारून आम्ही हे सामाजिक कार्य अविरत पणे करीत राहू असा निर्धार महादेव घाटाळ यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

## कशिवली ग्रामस्थांना मिळणार मुंबई महापालिके कडून पाणी; कपिल पाटील यांच्या प्रयत्नांना यश!

**भिवंडी : वार्ताहर**



भिवंडी तालुक्यातील धामणगाव कशिवली गावातील ग्रामस्थांना मुंबई महापालिकेकडून पाणीपुरवठा करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. कशिवली गावाला पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी विशेष प्रयत्न केले होते. भिवंडी तालुक्यातील धामणगाव कशिवली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कशिवली ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नव्हते. या गावा जवळून मुंबई महापालिकेची पाईपलाईन जात होती. मुंबई महापालिकेने तालुक्यातील इतर गावां प्रमाणेच कशिवलीलाही पाणीपुरवठा करावा, यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडून मुंबई महापालिकेच्या आयुक्तांकडे १२ मे २०२१ मध्ये पत्र देऊन केली होती. तर मुंबई महापालिकेचे तत्कालीन आयुक्त आय. एस. चहल यांच्याशी बैठक घेऊन याबाबत पाठपुरावा केला होता. अखेर पालिकेने धामणगाव कशिवली ग्रामपंचायतीला नुकतेच पत्र पाठवून नवीन तानसा जलवाहिनीवरुन ३२ मिमी व्यासाची जलजोडणी देऊन पाणीपुरवठा करण्यासाठी मंजुरी दिली आहे. कशिवली येथील पाण्याचा प्रश्न सोडविल्याबद्दल ग्रामस्थ संदेश भोईर, ज्ञानेश्वर पाटील, यशवंत पाटील, सुंदर पाटील, किरण भोईर, जगन पाटील, अनिल पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी कपिल पाटील यांची भेट घेऊन आभार मानले. त्यावेळी धामणगाव-कशिवली ग्रामस्थांच्या कायम पाठीशी उभा राहणार असल्याची ग्वाही कपिल पाटील यांनी दिली. या वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवेश पाटील यांचीही उपस्थिती होती.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/१७/मोप्र-१/दि.१८/१०/२०२३चे प्रपत्र

**मृद व जलसंधारण विभाग**

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**

मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे यांचे कार्यालय कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, जुना मुंबई-पुणे रोड, कळवा (प)

दुरध्वनी क्रमांक : ०२२-२५४२८१२७ ई-मेल पत्ता : eemilsdnt@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र. ब- १/२३ सन २०२५-२६**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमून्यातील निविदा सीलबंद लिफाफ्यात मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार प्रकल्प व्यवस्थापक जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र ठाणे तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामांचे नाव** : १) मौजे गुंदले गावठाणपाडा, ता.जि. पालघर येथे सिमेंट कॉंक्रिट बंधारा बांधणे.
(प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.०)

**निविदेची अंदाजित किंमत** : **१) रु. २६,६४,४७९/-**

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** : दिनांक : ०३/११/२०२५ ते दिनांक : १०/११/२०२५

**ई-निविदा भरण्याचा कालावधी** : दिनांक : ०३/११/२०२५ ते दिनांक : ११/११/२०२५

**ई-निविदा उघडणे** : दिनांक : २१/११/२०२५ (शक्य झाल्यास)

खालील संकेतस्थळावर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यासवरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.)

२) संकेतस्थळ जाहिरातीची माहिती http://www.cemilspn.in

३) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांचे कार्यालयातील सूचना फलकावर.

**जा.क्र. जिजअ/मृवजवि/ठाणे/लेशा-/३५०१/२०२५**

दिनांक : २८/१०/२०२५

कार्यालय, जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे.

**सही/-**
**फरीद खान**
**प्रकल्प व्यवस्थापक**
**जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र ठाणे**
**तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग**
**कळवा -ठाणे**

**जिमाका/पालघर/जाहि ७९/४०८/२०२५ दिनांक : २९/१०/२०२५**

# शेतकऱ्यांच्या हाती भोपळा!

शेतकऱ्यांची फसवणूक ही आता नित्याची झाली आहे. निसर्ग तर आयुष्यभर शेतकऱ्याला फसवतच आलाय. पण सरकार पीकविमा कंपन्या आणि शेतीची अवजारे विकणारेही शेतकऱ्यांना फसवण्यात मागे नाहीत. सावकारांकडून फसवणूक तर नित्याचीच आहे. थोडक्यात गरीब शेतकरी चारी बाजूनी बदला जात आहे. त्याला कोणी वालीच राहिलेला नाही. अब्जावधीचे व्यवहार करणाऱ्या सरकारकडून शेतकऱ्याला पीक विम्याचे ३आणि चार रुपये मिळतात तेंव्हा शेतकऱ्यांवर आत्महत्ये शिवाय पर्याय नसतो. जो बळीराजा पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत अकोल्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात तुटपुंजी रक्कम जमा करण्यात आली आहे. एकतर अतिवृष्टीने आणि परतीच्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांची हाती काहीच लागलेले नाही. पीक तर गेलंच पण अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील माती सुद्धा खरडून वाहून गेली आहे. शेतकऱ्यांसमोर अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. त्यात केवायीसीच्या संथ प्रक्रियेने त्यांना सरकारकडून मिळणारी मदतही वेळेवर मिळाली नाही. दिवाळीत अंधारमय झाली. त्यात पंतप्रधान पीक विमा योजनेतंर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून ३, ५, ८, २१ रुपये खात्यात जमा झाल्याने एकच संताप उसळला आहे. निसर्गाने सतावलेले असतानाच आता सुलतानी ताप शेतकऱ्यांना सहन करावा लागत असल्याचे समोर आले आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेतंर्गत जमा झालेली नुकसानभरपाई अत्यंत तुटपुंजी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. तर शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शासनाला जर शेतकऱ्यांचा सन्मान करता येत नसेल, तर किमान ५ रुपये, ८ रुपये, ३ रुपये अशा स्वरूपात मदत पाठवून आमचा अपमान तरी करू नये. हा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याचा दावा शेतकरी करत आहे. त्यांनी पीक विमा कंपन्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह व्यक्त केले आहे. तर सरकारचा या कंपन्यांवर जरब आहे की नाही असा सवाल विचारण्यात येत आहे. तर शेतकऱ्यांनी ही भावना व्यक्त करत शासनाचा जाहीर निषेध नोंदवला असून, पिक विमा योजनेअंतर्गत मिळालेली ही तुटपुंजी व अपमानास्पद आर्थिक मदत त्यांनी शासनाला परत करण्याचा निर्णय घेतला आणि वीस ते पंचवीस शेतकऱ्यांनी खात्यात जमा झालेली रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडे धनादेश आणि रोख रक्कमेने परत करण्यात आले. शासनाने आता तरी शेतकऱ्यांची थट्टा करणे थांबवावे, अशी विनंती ही शेतकऱ्यांनी निवेदनातून केली आहे. ५ रुपये, ८ रुपये, ३ रुपयांमध्ये काय विकत घेता येते असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. पीक विम्यासाठी शेतकऱ्यांकडून रक्कम जमा करण्यात आली. पावसाने थैमान घातले. उभे पीक नासले. शेतात पाणी तुंबलेले आहे. सर्वच पीक पाण्यात सडली आहेत. अनेक ठिकाणी जमीन खरडून गेली आहे. त्यावर पीक विमा कंपन्या कोणत्या निकषानुसार अशी मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करत आहे, असा सवाल शेतकऱ्यांनी केला शेतकरी आदित्य मुरकुटे आणि केशव केंद्रे यांच्यासह अनेक शेतकरी व काँग्रेस नेते कपिल ढोके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे नुकसान भरपाईची तुटपुंजी रक्कम जमा केली. बच्चू कडू यांच्या आंदोलनानंतर सरकारने ३0जूनपर्यंत शेतकऱ्यांच्या मदतीबाबतचा निर्णय घेऊ असे आश्वासन दिले आहे. पण सरकार खरोखरच आपला शब्द पाळेल का हाच खरा प्रश्न आहे. कारण सरकारवर जवळपास ७ लाख कोटींचे कर्ज आहे. कर्जाची रक्कम डोंगराएवढी आहे. त्या तुलनेत ५0 टक्केही सरकारचे महसूली उत्पन्न नाही. त्यामुळे कर्जमाफी कशी करणार हा प्रश्न सर्वांच्याच मनात आहे. पण सरकारला त्याची चिंता नाही. कारण जनतेला दिलेली आश्वासने पाळायलाच हवीत असे काही नियम नाहीत. त्यामुळे वाट पाहण्याशिवाय शेतकऱ्यांच्या हाती काही नाही. मात्र पीक विम्याच्या नुकसान भरपाई प्रमाणे २ किंवा ४ रुपयांचे चेक सरकारकडून मिळू नयेत कारण ती शेतकऱ्यांची मोठी थट्टा ठरेल.

# 'अंधभक्तां'नो तुमचाही रोहित आर्या होणार?



भाजपा कधी कोणाचा कसा वापर करून नंतर त्याला फेकून देईल याचा नेम नाही आणि त्याची अनेक उदाहरणे सुद्धा समोर आहेत. आज मोदी, फडणवीस यांची जे लाल करीत आहेत.सोशल मीडियावर भाजपा नेत्यांचे गुणगान गात आहेत. त्यांचेही असेच होणार आहे. तेंव्हा त्यांना कळेल भाजपची अंध भक्ती किती धोकादायक असते. कारण कधी काळी रोहित आर्या हा सुधा भाजपचा अंध भक्त होता शेवटी काय झाले? ज्यांची पालखी नाचवत होता त्या फडणवीसांच्या पोलिसांनी अन्यायकारकरित्या त्याचे एन्काऊंटर केले. कोणताही माणूस विनाकारण गुन्हा करीत नाही. खास करून ज्याचा पूर्वी कोणताही क्राइम हिस्ट्री नसतो अशा माणसाच्या हातून जेंव्हा एखादा गंभीर गुन्हा घडतो तेंव्हा त्या गुन्हे मागचे कारणही तसेच असते. अशा माणसाला परिस्थिती किंवा शासन प्रशासनाचा निष्ठुरपणा कारणीभूत असतो. अर्थात काही जरी असले तरी गुन्ह्याचे समर्थन करता येत नाही कारण शेवटी गुन्हा हा गुन्हाच असतो .त्यामुळं असा गुन्हा करणाऱ्याला कायद्याने शिक्षा व्हायलाच हवी. पवई सारख्या पॉश एरियात आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या विरोधात रोहित आर्या नावाच्या इसमाने मुलांचे आणि २ पालकांचे अपहरण करून त्यांना बंदुकीच्या धाकावर ओलीस ठेवणे हा निश्चितपणे गंभीर गुन्हा आहे. पण या गुन्ह्यात त्याचे एन्काऊंटर करणे आवश्यक होते का? कारण रोहित हा काही दहशतवादी नव्हता. शिवाय अपहरण नात्यानंतर त्याने पोलिस आणि प्रशासनाशी संवाद साधला होता. त्यामुळे त्याला पकडता आले असते. विशेष म्हणजे हा गुन्हा त्याने खंडणीसाठी केला नव्हता तर शिक्षण विभागाकडून अन्याय झाल्याने व अनेक वेळा प्रयत्न करूनही न्याय न मिळाल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलले होते. मुंबईच्या पवईमधील ओलिस नाट्यप्रकरणी आरोपी रोहित आर्या याच्याविषयी नवी माहिती समोर आली आहे. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानाअंतर्गत प्रोजेक्ट 'लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर' या प्रकल्पाचे तो संचालक होता. शालेय शिक्षण विभागाने स्वच्छता मॉनिटर अभियान गुंडाळल्याने ४५ लाख रुपयांचे नुकसान झाले', असा दावा रोहित आर्यने केला होता. या प्रकरणी त्याने तत्कालीन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची भेट घेऊनही फायदा झाला नसल्याचे म्हटले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकल्पासाठी २० कोटी ६३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती, मात्र सरकार पैसे देत नसल्याने त्याने यापूर्वी आझाद मैदानावर उपोषणही केले होते. सततच्या तणावातून तो उपचार घेत असल्याचेही समोर आले आहे.मुंबईतील पवईतील ओलीस प्रकरणातील आरोपी संदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. दीपक केसरकर शिक्षण मंत्री असताना रोहित आर्यने उपोषण केलं होतं. स्वच्छता मॉनिटर अभियानात सरकारने पैसे थकवल्याचा आरोप रोहित आर्यने केला होता १२ जानेवारी २०२४ रोजी शासन आदेश काढून रोहित आर्यची प्रोजेक्ट लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर अभियानाच्या प्रकल्पाच्या संचालक पदी नियुक्ती करण्यात आली होती. या प्रकल्पासाठी २० कोटी ६३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानाच्या प्रचार आणि प्रसाराची जबाबदारी प्रोजेक्ट लेट्स अंतर्गत रोहित आर्यवर होती. शालेय शिक्षण विभागाने स्वच्छता मॉनिटर अभियान गुंडाळल्याने नुकसान झाल्याचा दावा रोहित आर्याने केला होता.४५ लाख रुपये बुडवल्याचा रोहितचा आरोप होता. रोहित आर्याने काही दिवसांपूर्वी आझाद मैदानातही उपोषण केलं होतं. तत्कालीन शालेय शिक्षण मंत्र्यांची भेट घेऊनही फायदा न झाल्याचा दावा आर्याने केला होता. काही दिवसांपासून तणावात असल्याने उपचार घेत असल्याची माहिती आहे. काही दिवसांपूर्वी माजी शालेय मंत्री दिपक केसरकर यांच्या घराबाहेर आंदोलन केलं होतं. रोहीत आर्य हा नागपूरच्या शाळेत प्राध्यपक असल्याची माहिती समोर आली आहे. त्याने नागपूरमध्ये एक स्वच्छता मोहीम राबवली होती. त्यावेळीच्या शालेयमंत्री दिपक केसरकर यांनी हा निधी त्याला त्यावेळी दिला नाही. त्याने स्वखर्चाने ६० ते ७० लाख रुपये खर्च केला होता. हा निधी न मिळाल्याने रोहित आर्याने आंदोलन केलं होतं. दीपक केसरकर यांच्या शासकीय बंगल्याबाहेर त्याने आंदोलन केलं होतं. एवढंच नाहीतर रोहित आर्यने आझाद मैदानात देखील आंदोलन केलं होतं.रोहित आर्य हा मुंबई पवई परिसरात एक्टींग क्लासेस आणि ऑडिशनसंदर्भातील काम करतो. सोशल मीडियावर तो आपली ओळख फिल्म मेकर आणि मोटीव्हेशन स्पीकर अशी सांगतो. 'अप्सरा' नावाने त्याचे युट्यूब चॅनेल आहे. गेल्या काही दिवसांपासून तो मानसिक तणावात असून आपल्यावर सरकारकडून अन्याय होत असल्याचं त्याचं म्हणणं आहे.रोहित आर्य मागील काही दिवसांपूर्वी उपोषणाला बसला होता, सरकारकडे त्याचे पैसे आहेत, त्याने लोन काढून शिक्षण विभागासाठी एक प्रोजेक्ट केला होता. स्वच्छता मॉनिटरसंदर्भातील या प्रोजेक्टसाठी त्याचे पैसे लागले असून सरकारने त्याचे पैसे न दिल्याने कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचं त्यांचं म्हणणं आहे. याप्रकरणी, पोलीस अधिक तपास करत आहेत. पवईच्या महावीर क्लासिक बिल्डिंगमील आर.ए. स्टूडिओमध्ये गेल्या ५ ते ६ दिवसांपासून सिनेमा, वेब सीरीजसाठी कास्टिंग केले जात होते. त्यासाठी, १७ जणांचे फाइनल कास्टिंग झाले. त्यामुळेच, येथील स्टुडिओत आज १७ मुले आणि दोन पालक उपस्थित होते. दुपारी जेवणाच्या वेळेत ही मुले स्टुडिओतून बाहेर गेल्यानंतर पालक चिंतेत होते. कारण, ही मुले काचेतून आपला हात दाखवत इशारा करत होती. दरम्यान, घटनास्थळी पोलीस आल्यानंतरच हा किडनॅपिंगचा प्रकार असल्याचे उघडकीस आले. पण पोलिसांनी त्याला जिवंत पकडण्याऐवजी त्याचे एन्काऊंटर केले. पण आता हे एन्काउंटर वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. कारण एक वकील या एन्काऊंटरच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागणार आहे. त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

– सोनू जाधव, मुंबई

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १ हजार ३५२ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

## नाईकबंबवाडी औद्योगिक वसाहतीत 'मेगा प्रोजेक्ट' देऊ –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सातारा : वार्ताहर



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फलटण येथे नीरा देवघर प्रकल्पाच्या उजवा मुख्य कालव्याच्या दुसऱ्या टप्प्याच्या शुभारंभासह १ हजार ३५२ कोटी रुपये रकमेच्या विविध विकासकामांचे ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. फलटण शिंगणापूर रस्त्यावरील नाईकबंबवाडी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीमध्ये एक मोठा (मेगा) औद्योगिक प्रकल्प देण्यासह तालुका व परिसरातील विविध विकास कामे सुरू करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. फलटण येथे आयोजित भूमिपूजन कार्यक्रम व शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराजे देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आदी उपस्थित होते. फलटण ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमी असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शासनाने या परिसराला दुष्काळमुक्त करण्यासाठी नीरा देवघर कालव्याच्या कामातील अडचणी दूर करून कामाला सुरुवात केली आणि प्रकल्पाचे पाणी फलटण आणि माळशिरसला देणे शक्य करून दाखविले आहे. माणदेशाच्या साहित्यात दुष्काळावरील चित्रण दिसून येते, हा दुष्काळ दूर करण्याचे काम शासनाने हाती घेतले असून सर्व कामे पूर्ण झाल्यावर हरित माणदेश तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### दुष्काळमुक्ती हाच ध्यास

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, नीरा देवघर, जिहे कटापूर, टेंभू उपसा योजनेचे वेगवेगळे टप्प्यातून दुष्काळी तालुक्यांना पाणी दिले आहे. सांगोल्यासारख्या दुष्काळी भागात पाणी पोहोचविण्यात आले आहे. माळशिरस तालुक्यातील पाण्यापासून वंचित २२ गावांना पाणी देण्यात येईल. नीरा देवघर प्रकल्पातील तीन उपसा सिंचन योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. या परिसराच्या विकासासाठी आणि दुष्काळमुक्तीसाठी शासन येथील जनतेच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

### फलटण परिसराचा सर्वांगीण विकास करणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या सर्व सुविधा फलटण शहरात आल्या आहेत. प्रशासकीय इमारत, पोलीस ठाणे, न्यायालय आदींच्या माध्यमातून नागरिकांचे जीवन सुकर होणार आहे. येथील विविध विकास कामांना चालना दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पाडेगाव–साखरवाडी–जिंती–फलटण–शिंगणापूर रस्ता करण्यात येईल. माणगंगा नदीचा समावेश अमृत २ मध्ये करण्यात येईल आणि फलटण येथे न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येईल. फलटण येथील विमानतळाच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात येईल. फलटण येथील रुग्णालयातील सुविधा अद्ययावत करण्यात येतील, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. सामान्य माणूस आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शासन कार्यरत आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांची वीज बील माफीसारखी योजना सुरू राहील. सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण झाल्यावर शेतकऱ्यांना दिवसा वीज मोफत देण्यात येईल. तसेच राज्यातील सर्व उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर नेण्यात येतील, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, फलटण परिसराच्या दुष्काळ मुक्तीसाठी शासनाने महत्वाचे निर्णय तसेच प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यामुळे माण, खटाव आणि फलटण परिसरातील दुष्काळ दूर होणार आहे. नीरा देवधर प्रकल्पाच्या उजव्या कालव्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. अनेक योजना मार्गी लागत असून फलटणच्या विकासाचा मार्ग त्यामुळे खुला झाला आहे. उद्योग, वाहतूक आदी क्षेत्रातही विकासाला चालना मिळाली आहे. असे त्यांनी सांगितले. आमदार सचिन पाटील यांनी आपल्या मनोगतात फलटण तालुक्यात अनेक विकासकामे होत असल्याचे नमूद केले. माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी आपल्या मनोगतात तालुका व परिसरात झालेल्या व हाती घेण्यात आलेल्या विकासकामांविषयी माहिती दिली. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शुभारंभ, लोकार्पण होणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. या १ हजार ४०० कोटी रुपयांच्या विकासकामांमुळे येथील शेती आणि उद्योग क्षेत्राला चालना मिळेल व परिसराचा सर्वांगीण विकास होईल. नीरा देवधर उजव्या कालव्याच्या दुसऱ्या टप्प्यातील कामामुळे १२ हजार हेक्टर क्षेत्रातील शेतीला फायदा होऊन शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार सचिन पाटील, मनोज घोरपडे, अतुल भोसले, राहुल कुल, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, माजी आमदार राम सातपुते आदी उपस्थित होते.

### कार्यक्रमात झालेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन, शुभारंभ व लोकार्पण

- नीरा देवघर प्रकल्प उजवा मुख्य कालवा टप्पा २ किमी ८७ ते १३४ पर्यत बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे काम करणे (लाभ क्षेत्र १२ हजार ३१४ हे.) कामाचा कार्यारंभ– निविदा किंमत ९६७ कोटी रुपये
- प्रशासकीय भवन या नवीन इमारतीच्या कामाचा भूमिपूजन तथा कार्यारंभ सोहळा – रक्कम १८ कोटी ६९ लाख रुपये
- महसूल भवन या नवीन इमारतीच्या कामाचा भूमिपूजन तथा कार्यारंभ सोहळा – रक्कम ९ कोटी ७५ लाख रुपये
- फलटण शहरांतर्गत होणारा नवीन कॉंक्रिट पालखी मार्ग कामाचा कार्यारंभ – रक्कम ७५ कोटी रुपये
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजूर असणाऱ्या २० कोटी निधीचा ३ रस्त्याच्या कामाचा कार्यारंभ.
- आसू–फलटण–गिरवी या एम.एस.आय.डी.सी. योजनेतून सुरू असणाऱ्या एकूण ५० कि. मी. लांबीच्या व १९८ कोटी रुपये किमतीच्या काँक्रिट रस्त्याच्या कामापैकी फलटण ते गिरवी या पूर्णपणे बांधून झालेल्या रस्त्याचे लोकार्पण.
- फलटण शहर पोलीस ठाणे, फलटण ग्रामीण पोलीस ठाणे, तसेच वाठार स्टेशन येथे बांधण्यात आलेल्या नवीन पोलीस ठाणे इमारतींचे लोकार्पण – किंमत प्रत्येकी १२ कोटी २८ लाख ३६ हजार ९३२ रुपये (९ हजार ५०० स्के. फूट)
- फलटण येथे बांधण्यात आलेल्या ८७ पोलीस कर्मचारी निवास इमारतींचे लोकार्पण – रक्कम २७ कोटी ११ लाख ४८ हजार ६७७ रुपये (८० हजार स्के. फूट)

कार्यक्रमात विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यात पी.एम. जनमन योजनेंतर्गत घरकुल लाभ, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ प्रमाणपत्र, फळबाग लागवड व सेंद्रिय शेतीमध्ये उत्कृष्ट कामाबद्दल सन्मान, उत्कृष्ट बचत गट, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान यांना सन्मानित करण्यात आले.

# मौजे केवनाळेतील पुनर्वसितांच्या घरांसाठी वाढीव निधीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी – मंत्री मकरंद जाधव–पाटील

मुंबई : वार्ताहर

पोलादपूर तालुक्यातील मौजे केवनाळे (जि. रायगड) गावच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी जागेचे भूसंपादन करण्यात आले आहे. या जागेवर घर बांधण्यासाठी शासनाकडून प्रत्येक घरासाठी २.३० लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र या गावच्या नागरिकांनी घर बांधण्यासाठी वाढीव निधीची मागणी केली आहे. हा वाढीव निधी विविध कंपन्याच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून उपलब्ध होण्यासाठी संबधित कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत रायगड जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर बैठक घ्यावी, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिले. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मौजे केवनाळे ता.पोलादपूर जि. रायगड गावच्या कायमस्वरूपी पुनर्वसन संदर्भात मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस खासदार सुनील तटकरे, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण, मदत व पुनर्वसन विभागाचे सहसचिव संजय इंगळे आदी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन मंत्री जाधव–पाटील म्हणाले, केवनाळे येथील कुटुंबाचे खासगी मालकीच्या जागेमध्ये तात्पुरते पुनर्वसन करण्यात येऊन याठिकाणी वीज, पाणी पुरवठा, शौचालय आदी सुविधांसाठी निधी वितरित करण्यात आला आहे. या नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी जागेचे भूसंपादन करण्यात आले आहे. नागरिकांनी इरशाळवाडी व तळीये येथील नागरिकांना देण्यात आलेल्या घरांप्रमाणे घरे मिळावीत अशी मागणी केली आहे. यासाठी विविध कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून अधिकचा निधी मिळण्याबाबत बैठक घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. केवनाळे गावांमधील नागरिकांना घर बांधणीसाठी प्रत्येक घरासाठी २.३० लाखाचा निधी राज्य गृह व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण ऐवजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीमार्फत पात्र लाभार्थ्यांना देण्यासाठी मंजुरी देण्यात येऊन हा निधी जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत संबंधित तहसीलदारांकडे वर्ग करण्यात आला आहे, असेही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई–६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०–२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा–वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

03 TO 09 NOVEMER 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 11/1/2025 8:56 PM Page 1



# नालासोपारा फाटा येथे कंटेनर कठडा तोडून कोसळला; महिलेचा मृत्यू चौघे गंभीर जखमी



**नालासोपारा : वार्ताहर**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विविध प्रकारच्या कारणामुळे अपघाताच्या घटना समोर येत असतात. बुधवारी नालासोपारा फाटा येथे रात्रीच्या सुमारास कंटेनरचा टायर फुटल्याने नियंत्रण सुटले आणि थेट हा कंटेनर कठडा तोडून खाली उलटला. हा कंटेनर खाली उभ्या असलेल्या वाहनांवर कोसळला असल्याने त्यात असलेले प्रवासी जखमी झाले आहेत. एका प्रवाशाचा मृत्यू झाली असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरू असते. मागील काही वर्षात अवजड मालवाहतूक वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. या महामार्गावर सातत्याने अपघाताच्या घटना ही समोर येत आहे. बुधवारी रात्री पावणे दहाच्या सुमारास एक मालवाहतूक कंटेनर गुजरात वाहिनीवरून मुंबईच्या दिशेने निघाला होता. सोपारा फाटा येथे पोहचताच कंटेनरचा टायर फुटला त्यामुळे अनियंत्रित होऊन कठड्यावरून थेट खाली कोसळला. मात्र हा कंटेनर खाली उभ्या असलेल्या दोन चारचाकी वाहनांवर कोसळला असल्याने मोठी दुर्घटना घडली आहेत. त्या वाहनात असलेले तीन ते चार प्रवासी जखमी झाले आहेत तर एका प्रवासी महिलेचा यात मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. वाहतूक पोलीस, पेल्हार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यात अडकून पडलेल्या प्रवाशांना बाहेर काढून तातडीने त्यांना रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

दरम्यान मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर काँक्रिटिकरणामुळे रस्त्यांची उंची वाढली आहे. या उंचीमुळे वर्सोवा ते विरार फाटा या दरम्यान असलेल्या उड्डाणपुलांच्या संरक्षित कठड्यांची उंची कमी झाली आहे. त्यामुळे भरधाव वेगाने येणारी वाहने त्या पुलावरून खाली कोसळून अपघात होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली होती. अखेर या घडलेल्या घटनेनंतर सुरक्षा कठड्यांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# नुकसानग्रस्त शेतीच्या पंचनाम्यांना सुरुवात ७८ हेक्टर शेतीची पाहणी पूर्ण

**वसई : वार्ताहर**



गेल्या काही दिवसांत शहरात झालेल्या अवकाळी पावसामुळे वसई-विरारच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काढणीच्या वेळीच पाऊस कोसळल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला होता. अखेर शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर कृषिविकास खात्याकडून नुकसानग्रस्त शेतजमिनींच्या पंचनामे सुरू केले आहेत. वसई-विरारच्या ग्रामीण पट्ट्यात भातशेती, केळीची लागवड, तसेच विविध प्रकारची फुले आणि भाज्यांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. मात्र, ऐन ऑक्टोबरमध्ये पिकांची कापणी सुरू असतानाच झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांची भातशेती आडवी झाली आहे, तर फुले आणि भाजीपाला पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांनी तसेच बोईसरचे आमदार विलास तरे, माजी आमदार राजेश पाटील यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांना त्वरित मदत देण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या या मागणीची खात्यामार्फत पंचनामा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी २१२ शेतकऱ्यांच्या ७८ हेक्टर शेतजमिनींचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. तर उर्वरित सर्व नुकसानग्रस्त शेतजमिनींचे पंचनामे शुक्रवारपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत असे तालुका कृषी अधिकारी सुरज जाधव यांनी सांगितले आहे.

# 'ऑनलाइन गेम'मध्ये पैसे हरल्याने वर्सोवा पुलावरून उडी मारून तरुणाने संपवले जीवन

**वसई : वार्ताहर**

ऑनलाइन गेम खेळण्याचे व्यसन अधिकच धोकादायक ठरू लागले आहे. या गेम मध्ये पैसे हरल्यानंतर नैराश्यात जाऊन आत्महत्या करण्याच्या घटना ही समोर येत आहेत. मंगळवारी ऑनलाइन गेम मध्ये पैसे हरल्याने मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वर्सोवा पुलावरून उडी मारून एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. प्रदीप जैस्वाल (४०) असे या व्यक्तीचे नाव आहे.ऑनलाइन जुगारात पैसे हारल्याने आलेल्या नैराश्यातून हे टोकाचे पाऊल उचलले आहे. प्रदीप जैस्वार हा घोडबंदर रोड येथील बामनोली पाडा येथे राहत होता. त्याला ऑनलाइन गेम खेळण्याचे व्यसन लागले होते. त्या ऑनलाइन गेम मध्ये हरल्याने त्यांनी ऑनलाइन स्वरूपात मिळणारे कर्ज ही घेतले होते. मात्र कर्ज कसे फेडायचे या विचाराने तो नैराश्यात होता. याच नैराश्यातून मंगळवारी सायंकाळी त्यांनी मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या वर्सोवा पुलावरून खाली उडी मारली यात त्याच्या डोक्याला गंभीर दुःखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# ज्ञानेश्वर भाऊ सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय साहीत्य सारथी समाजरत्न पुरस्कार

**देवणी : वार्ताहर**



समाजसेवक व अनेक पुरस्कार प्राप्त तथा साहीत्य सारथी समाज रत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आलेले ज्ञानेश्वर भाऊ सुर्यवंशी देवणीकर श्रमीक हक्क अभियान महाराष्ट्र सलग्न नॅशनल दलित मानवी हक्क अभियान भारत, यासह अनेक सामाजीक संस्था, संघटना, शासन, प्रशासना सोबत राहुन केलेल्या त्यांच्या निष्ठा आणि निस्वार्थ समाजसेवेस प्रभावीत झालेला जनसमान्यातील, गौरवशाली, गरीबांचा वाली, कुशल संघटक, मुस्तदी, संघर्षशील लोकनता मानवी हक्काच्या साठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, रोजगार,पाणी, रस्ते, विज आणि आरोग्य या मूलभुत प्रश्नाच्या सोडवणुकीचे अन्याय अत्याचाराच्या मुक्तीच्या व निर्गुणाच्या साठी मानवी अत्याचार पिडीतांना, निर्वासीतांना, निराधारांना, श्रमीक कष्टकरी, शेतकरी, भुमीहीन, शेतमजूर, गायराण धारक, गावठाण धारक, बेघर धारक यांच्यासाठी विविध प्रकारच्या प्रश्ना वर सतत लढा लढून व या सर्वांना मरणोत्तर स्मशानभुमी शांतीपुर्ण अनंतात विलीन होण्यासाठी पवीत्र स्मशानभुमी जागा मिळविण्यासाठी म्हणुन स्मशानभुमीच्या जागेसाठीची आंदोलने करुन त्या प्रश्नांसह मानवांना मुलभुत सुख सोयी सुवीधा संवीधानीक मुलभुत हक्कासाठी अविरत कार्यकर्ता म्हणुन अनेक पुरस्कार प्राप्त ते समाभुषण ते समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त होणे व पूढील जिवणात अनेक पुरस्काराच्या नावनोंदणीत राज्यासह राष्ट्रीय स्तरावरील समाजरत्न म्हणुन दि. १२/१०/२०२५ रोजी जय क्रांती महाविद्यालय भव्य सभागृहात साहीत्य सारथी कलामंचच्या वतीने राज्यस्तरीत मराठी साहीत्य संमेलन सोहळ्यात ज्ञानेश्वर भाऊ सुर्यवंशी देवणीकर यांना साहीत्य सारथी समाज रत्न पुरस्काराने उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते गौरवीण्यात आले. यावेळी जयप्रकाशजी दगडे, भारतजी सातपुते, सुप्रसीध्द कवी संतोष सोमवंशी, दिपाली आवटे, विवेक सौताडेकर, सुरेश धोत्रे, अध्यक्ष गंगाधर डिगोळे, उपाध्यक्ष शादुल बौडीवाले, कार्याध्यक्ष गणेश परले, कोषाध्यक्ष शिवशंकर बलुले, पुणे शाख अध्यक्ष प्रशांत पाटोळे, यांच्यासह अन्य कलावंत, कवी, साहीत्यीक, सामाजिक मान्यवर डॉक्टर, वकील आदींच्या उपस्थितीत आयोजित समारंभात गौरविण्यात आले.

# देवणी तालुक्यातील विळेगाव येथे घरफोडी करून २५ तोळे सोने लंपास




**देवणी : वार्ताहर**

देवणी तालुक्यातील विळेगाव येथे मध्यरात्री अज्ञात चोरट्याने एका शेतकऱ्याच्या घरात तब्बल घुसून ९ लाख ९८ हजार ७०१ सोन्याचे दागिने चोरीस नेल्याची धाडसी घरफोडी केली आहे, या घटनेमुळे परिसरात भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. किशन विठ्ठलराव पाटील वय ७२ वर्ष व्यवसाय शेती रा. विळेगाव ता देवणी यांच्या फिर्याद वरून देवणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्या प्रमाणे दिनांक २७ ऑक्टोंबर रात्री दहा वाजल्यापासून ते २८ ऑक्टोंबरच्या पहाटे २ वाजेपर्यंत आज्ञान चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला घरात कोणी नसल्याचे संधी साधत चोरट्याने कपाट फोडून, बॅग फाडून सोन्याचे दागिने लंपास केले. एकूण २४ तोळे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ज्यात अंगठ्या, झुमके, बोरमाळ, नेकलेस, लॉकेट, मिनी गंठण, पवळे हार, आदींचा समावेश आहे या सर्वाची किमंत अंदाजे. ९ लाख ९८ हजार ७०१ असल्याचे नमूद केले आहे. घटना स्थळाचा पोलिसांनी पंचनामा केला असून गुन्हा भारतीय दंड विधानाच्या संबंधित कलमान्वये नोंदविण्यात आला आहे.

# एलकुंदे येथे ग्रामपंचायत व्यायामशाळेचे लोकार्पण



**भिवंडी : वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल कधी ही वाजू शकते. त्यामुळे अनेक ठिकाणी विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन मोठ्या प्रमाणा वर सुरू आहेत. सोनाळे ग्रुप ग्रामपंचायत क्षेत्रातील एलकुंदे येथे विद्यमान सरपंच सरपंच रुपाली जितेंद्र मानेरकर यांच्या पुढाकारातून ग्रामपंचायत निधीतून सुसज्य साहित्याने युक्त व्यायामशाळा बनविण्यात आली आहे. या व्यायामशाळेचा लोकार्पण माजी आमदार रुपेश म्हात्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य अतिथी म्हणून काँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष दयानंद चोरघे, माजी जिल्हा परिषद सभापती उज्वला गणेश गुळवी, देवा ग्रुपचे तानाजी मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामपंचायत सरपंच रुपाली जितेंद्र मानेरकर यांच्या शुभहस्ते मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर

११६, पहिला मजला, जिल्हा परिषद इमारत, कोळगाव, पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रमांक : ०२५२५-२०५४२०   ई-मेल : dhopalghar@gmail.com

### थेट मुलाखत (Walk in Interview)

पालघर जिल्ह्यातील आदिवासी दुर्गम भागामध्ये भरारी पथकांसाठी तात्पुरत्या स्वरूपात मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका करावयाचे आहेत. पदांचा व मुलाखतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | रिक्त पदांची संख्या | प्रतिमहा मानधन | थेट मुलाखती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मानसेवी वैद्यकिय अधिकारी | बी.ए.एम.एस. | कमाल खुला ३८ वर्षे मागासवर्गीय ४३ वर्षे | ०४ | रु. ४०,०००/- | दि. ०४/११/२०२५ वेळ - ३.०० वाजता |

१) उमेदवारांनी थेट मुलाखतीच्या वेळेस विहित अर्जासहित त्यांचे नाव, वय, पत्ता, मोबाईल नंबर, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादी माहिती व त्या अनुषंगाने प्रमाणपत्र जोडलेल्या अर्जासह तसेच मुळ प्रमाणपत्रासह उपरोक्त दर्शविलेल्या दिवशी खालील ठिकाणी उपस्थित राहावयाचे आहे.
२) सदरच्या पदसंख्येत बदल होणेची शक्यता आहे.
३) थेट मुलाखतीद्वारे पदे भरली न गेल्यास महिन्याचे दुसऱ्या आठवड्यातील मंगळवारी थेट मुलाखती घेतल्या जातील.
४) नियुक्तीचे सर्व अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

**ठिकाण : ११६, पहिला मजला, जिल्हा परिषद इमारत, कोळगाव, पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर**

सही/-
(डॉ. संतोष चौधरी)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

सही/-
(मनोज रानडे, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

# शीतपेयांच्या गोदामाला भीषण आग

**वसई : वार्ताहर**

नालासोपाऱ्यात गोदामाला आग लागल्याची घटना घडली आहे. नालासोपारा पश्चिमेत बहुजन विकास आघाडीचे कार्यालय आहे. बुधवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास या कार्यालयानजीकच्या एका बंद इमारतीत आग लागल्याची घटना घडली. आग भीषण असल्यामुळे इमारतीतून निघणारे धुराचे मोठे लोट सर्वत्र पसरले होते. ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आग लागलेल्या या इमारतीमध्ये शीतपेयांचे (कोल्ड्रिंक्स) मोठे गोदाम होते. या गोदामात मोठ्या प्रमाणात शीतपेयांचा साठा करण्यात आला होता. शीतपेयांच्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि इतर साठवलेल्या वस्तूंमुळे वेगाने आग गोदामात पसरली. त्यामुळे धुराचे लोट दूरवर दिसत होते. वाढती आग पाहून स्थानिकांनी घटनेची माहिती अग्निशमन दलाला कळवली. घटनेची माहिती मिळताच वसई-विरार शहर महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. पण, आग लागण्याचे नेमके कारण अद्यापही अस्पष्ट असल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले आहे. सुदैवाने, ही इमारत बंद असल्यामुळे या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, गोदामातील शीतपेयांचा साठा व अन्य साहित्य जळाल्याने गोदाम मालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### अर्नाळा येथे मुलभूत हक्कांसाठी लाल बावटा पक्षाचे शिष्टमंडळ

विरार : सर्वसामान्य जनतेच्या मुलभूत हक्कांच्या मागण्यांसाठी लाल बावटा पक्षाच्या एका जंबो शिष्टमंडळाने अर्नाळा ग्रामपंचायतचे सरपंच नंदकुमार घरत आणि ग्रामविकास अधिकारी नितीन राणे यांची भेट घेतली. यावेळी विविध विविध प्रश्नांवर शिष्टमंडळाने चर्चा केली आणि मागण्यांचे निवेदन स्थानिक प्रशासनाला सादर केले. स्थानिक नागरिकांच्या समस्या व मूलभूत गरजांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे व काही कामांना प्रशासनाने तातडीने सुरुवात केली असल्याचे पक्षाचे जिल्हा सहसचिव कॉ. शेरू वाघ यांनी माध्यमांना सांगितले. यावेळी लोकशाही युवा संघटनेचे तालुका अध्यक्ष कॉ. अनिरुद्ध मेहेर, गाव कमिटी प्रमुख कॉ. आरती वांगड, कॉ. भारती जाधव, कॉ. सुचिता चव्हाण, कॉ. सविता तुंबडे, कॉ. अनिल शिंदे आणि कॉ. बसती मसार यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### शकुंतला उमाटे यांचे निधन



देवणी : सौ शकुंतला शिवाजीराव उमाटे (वय ७७) रा.अनंतवाडी ता. देवणी यांचे गुरुवार दि. ३० रोजी पहाटे चार वाजता अल्पशा आजारामुळे निधन झाले.त्यांच्यावर दुपारी ३ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पती, तीन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. दैनिक सकाळचे पत्रकार बाबासाहेब उमाटे यांच्या त्या मातोश्री होत्या.

### उद्योगपती अशोक भूतडा यांचा सत्कार

लातूर : लातूर येथील प्रसिद्ध उद्योगपती कीर्ती उद्योगाचे चेअरमन, शेतकऱ्यांच्या सोयाबीन उत्पादकांचे अर्थ दाते अशोक भूतडा यांचा मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने लातूर येथील अंबाजोगाई रोड वरील ओन्ली वन हॉटेलच्या सभागृहात जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव नरहरे सचिव पांडुरंग देडे, उपाध्यक्ष ॲड. शेखर हविले, ॲड. शिवहर उतके, माजी कोषागार अधिकारी भुसने आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### धनगर समाज वधु वर परिचय मेळावा

लातूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वांगिण विकास मंडळ कार्यकारिणीची बैठक नुकतीच पार पडली असुन प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धनगर समाजाचा २० वा राज्यस्तरीय वधु - वर परिचय मेळावा रविवार, दि.२१ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. विष्णुदास मंगल कार्यालय, अहिल्यादेवी होळकर चौक, नवीन रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड लातूर येथे संपन्न होणार आहे. तरी इच्छुक वधु - वर - पालकांनी वधु - वरांची माहिती (बायोडाटा) पासपोर्ट फोटोंसह प्रत्यक्ष किंवा पोस्ट, कुरिअर, ईमेल (mgmandurke@gmail.com) द्वारे बुधवार दि.१० डिसेंबर, २०२५ पर्यंत पाठवावी. व्हॉटस्अपद्वारे पाठवु नये. तसेच वधू वरांच्या नोंदी स्वीकारण्यासाठी लातूर शहरात १८ ठिकाणी व चाकूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, उमरगा, लोहारा, तुळजापूर, धाराशिव, अंबाजोगाई, बीड, गेवराई, परळी, परभणी, चापोली, हादगाव, नांदेड, जालना, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर व पुणे येथे व्यवस्था करण्यात आली आहे. सदरील वधु - वर नोंदणी निशुल्क मोफत असुन या भव्य दिव्य वधू - वर परिचय मेळाव्यास सर्व समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९९६०६७५७७७, ९७६३७७९७२३ या मोबाईलवर संपर्क साधावा.

### विवाहितेनं संपवलं जीवन

नवी मुंबई : एका विवाहितेने आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना तळोजातील नावडे परिसरात उघडकीस आली आहे. वैशाली विनायक पवार (२१) असे या विवाहितेचे नाव असून २८ ऑक्टोबरला तिने सासरच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. तळोजा पोलिसांनी याची गंभीर दखल घेऊन मृत विवाहितेच्या सासरकडील सहा जणांविरोधात हुंडाबळीचा गुन्हा दाखल करून पती व सासू-सासरे यांना अटक केली आहे. वैशालीचे लग्न १० मे २०२३ रोजी तळोजा येथील नावडे गावात राहणाऱ्या उमेश पवार याच्याशी झाले होते. लग्नावेळी पती व सासरकडील नातेवाईकांच्या मागणीनुसार वैशालीच्या कुटुंबाने अडीच लाख रुपयांचा हुंडा व सोन्याचे दागिने दिले होते. मात्र तरीही कारखरेदीसाठी माहेरहून आणखी एक लाख रुपये आणावेत, यासाठी वैशालीचा छळ करण्यात येत होता. मात्र त्यानंतरही वैशालीचा पती उमेश पवार, सासू अरुणा पवार, सासरे रमेश पवार, नणंद सोनू राठोड, दुसरी नणंद नेहा राठोड व मेहुणा कृष्णा राठोड हे सर्वजण तिला पैशांसाठी सतत छळत होते.

### महिलांकडून उकळली लाखोंची खंडणी

नवी मुंबई : कॉर्पोरेट क्षेत्रातील उच्च पदावर कार्यरत असलेल्या एका नराधमाने त्याच्यासोबत कार्यरत असलेल्या महिलांना जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे या नराधमाने त्या महिलांचे अश्लिल व्हिडिओ चित्रीकरण करून त्याचा वापर करीत महिलांकडून लाखो रुपयांची खंडणीदेखील उकळली आहे. प्रदीप नरळे (३४) असे या नराधमाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या प्रकारात नरळे याला सहकार्य करणारी त्याची पत्नी रेणुका नरळे आणि त्याचा भाऊ प्रवीण नरळे हे दोघेही सध्या फरार आहेत. प्रदीप नरळेने नागपूरच्या शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेल्या ३२ वर्षीय महिलेशी ऑनलाइन मीटिंगदरम्यान ओळख वाढवली. नरळे याने तिला पनवेल येथील आपल्या घरी बोलावले. पाहुणचाराच्या बहाण्याने नरळे याने पीडित महिलेला गुंगीकारक औषध मिसळलेले जेवण देऊन नरळे याने तिच्यावर बलात्कार केला. पत्नी रेणुकाच्या मदतीने लैंगिक अत्याचार करतानाचे व्हिडिओ चित्रीकरण केले. पीडित महिला शुद्धीवर आल्यानंतर तिच्या हातातील सोन्याच्या अंगठ्या, मंगळसूत्र व रोख रक्कम लुटण्यात आल्याचे तिच्या लक्षात आले.

03 TO 09 NOVEMER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 11/1/2025 8:56 PM Page 1



## पान १ वरून....

### सासरच्यांनी टोकाचे पाऊल टाकले ...

मोहनदास आहेर याच्यासोबत घोडंबे गावात लावून देण्यात आला होता, त्याप्रमाणे पूजा ही सासरी वडगाव पंगू गावात नांदावयास गेली. विवाहानंतर पहिले तीन-चार महिने पूजाला तिच्या सासरच्या लोकांनी चांगले वागवले, पण त्यानंतर ते तिला त्रास देवू लागले. तिच्या सासरी नवरा वैभव मोहनदास आहेर, सासरा मोहनदास नारायण आहेर, सासू राजूबाई उर्फ लताबाई मोहनदास आहेर, भाया दीर मोहनदास आहेर आणि जावू रूपाली केशव आहेर अशी सर्व मंडळी होती. या सर्व लोकांनी पूजाला छळायला सुरूवात केली, तेंव्हा वेळोवेळी तिने होणाऱ्या त्रासाची माहिती माहेरच्या लोकांना दिली. माहेरच्या लोकांनी आता कळ काढ, पुढे चांगले वागवतील असा धीर देवून तिची समजूत काढली. आपली लहान बहीण श्रद्धाला सांगत असे की, 'मला चांगल्या ठिकाणी दिले नाही. तुला तरी चांगले स्थळ पाहून घे. नाही तर तू लग्नच करू नको.' लग्न झाल्यावर आपण सुखाचा संसार करून अशी तिला अपेक्षा होती, मात्र तिचा अपेक्षाभंग झाला होता. सासरी होणाऱ्या भयानक त्रासामुळे ती खूप व्यथित झाली होती, यामुळेच ती आपल्या बहीणीला तसा सल्ला देत असे. सासऱ्यांनी पूजाच्या मागे लकडा लावला की आपल्याला ट्रॅक्टर घ्यावयाचा आहे, त्यासाठी तू माहेरून दोन लाख रूपये घेवून ये. ती माहेरून दोन लाख रूपये आणत नाही म्हणून सर्वांनी तिला त्रास द्यायला सुरूवात केली. पूजाने ही माहिती माहेरी दिल्याबर फेब्रुवारी २०२४ मध्ये तिला त्रास होवू नये म्हणून तिच्या वडीलांनी कांदे विकून त्यांना दोन लाख रूपये दिले, तेंव्हा कुठे सासरची मंडळी शांत झाली. पूजा माहेरी आल्यावर काही दिवसानंतर पूजाचा पती वैभव हा तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिचा मोबाईल फोन चेक करू लागला. काहीतरी कुरापत काढून व संशय घेवून तिला मारहाण करू लागला. पूजाने या घटनेची माहिती माहेरी वडील, भाऊ, मामा आदींना दिली, तेंव्हा ते पूजाच्या सासरी समजावण्यासाठी गेले असता उलट तिचा पती वैभव, सासरे मोहनदास, दीर केशव यांनी त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. तुमची खानदान अशीच आहे का? असे बोलून त्यांचा उपमर्द केला होता. त्यानंतर त्यांनी पूजाला जास्तच त्रास देणे सुरू केल्यामुळे तिच्या माहेरच्या लोकांना आता पूजाची चिंता वाटू लागली. पूजाचे मामा समाधान भोईटे हे तीन ते चार वेळेस पूजाच्या सासरी गेले आणि पूजाला त्रास देवू नका असे त्यांनी समजावले, तरीही पूजाचा त्रास काही कमी झाला नाही. सुमारे तीन महिन्यापूर्वी पूजाची जाऊबाई रूपालीने कुरापत काढून पूजासोबत भांडण केले. त्या भांडणात रूपालीने पूजाच्या नवऱ्याचे कपडे फाडून टाकले, तेंव्हा माझ्या नवऱ्याचे कपडे का फाडले? असे ती बोलली असता रूपालीने तिला जिन्यावरून फरफटत खाली ओढून आणले आणि मारहाण केली. तिची सासू राजूबाई उर्फ लताबाई हिने रूपालीची बाजू घेवून पूजाला शिवीगाळ केली. या घटनेची माहिती तिने माहेरी दिली, तेंव्हा माहेरचे लोक तिच्या काळजीने व्यथित झाले. दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी पूजा रक्षाबंधन सणासाठी माहेरी कानमंडाळी गावी आली. तेंव्हा तिने माहेरच्या लोकांना सांगितले की, माझ्या सासरचे लोक मला म्हणतात की, तुझे लग्न होवून दोन वर्षे झाली तरी तुला मूल-बाळ होत नाही, त्यामुळे ते मला त्रास देतात. त्यावेळी माहेरच्या लोकांनी तिची कशीतरी समजूत घालून तिला सासरी पाठवले. मूल-बाळ होत नाही, तू वांझोटी आहे, असे सतत तिला टोचून बोलून तिच्या चारित्र्यावर संशय घेवून सर्व जण तिला सतत त्रास देवू लागले, तरीही ती जीव मुठीत घेवून त्या घरात नांदत होती आणि नशिबाला दोष देत जगत होती.पूजाची सासू राजूबाईने पूजाच्या वडीलांना फोन करून भांडण केले, तुमची मुलगी करंटी आहे. ती वांझोटी आहे. तिच्यावर आम्ही खूप पैसे खर्च केले, तरी पण तिला मूल-बाळ होत नाही. हा छळ काही थांबत नव्हता. यातून काही बरे- वाईट होते की काय असे पूजाच्या माहेरच्यांना वाटत होते. अखेर त्या लोकांना ज्याची भीती वाटत होती तशीच घटना घडली. सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास पूजाचा भाऊ अभिजीत हा कानमंडाळे गावी असतांना त्यांचा मामा समाधान भोईटे यांनी फोनवरून त्याला सांगितले की, पूजा विहीरीत पडली आहे. तिला मनमाड येथील रूग्णालयात नेले आहे, तेंव्हा अभिजीतने लागलीच दाजी वैभव आणि त्याच्या वडीलांना फोन केला, पण त्यांनी त्याचा फोन उचलला नाही, तेंव्हा अभिजीतने घरी ही माहिती दिली आणि तो मोटरसायकलने लगेच मनमाड येथील शासकीय रूग्णालयात आला असता त्याला पूजा मयत झाल्याचे दिसले. अभिजीतने जवळ जावून तिचा मृतदेह पाहिला असता पूजाला कोणत्या तरी धारदार हत्याराने मारहाण केल्याने तिच्या डोक्याला, कपाळावर, मानेवर, उजव्या कानामागे गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेल्या दिसून आल्या. तसेच तिच्या शरीराच्या इतर भागावर जखमा झाल्याचे त्याला दिसले. तिच्या शरीरावर खरचटल्याच्या निशाण्या व ओरखडे पडले होते. तिच्या मृतदेहाजवळ तिचा पती अथवा सासरचे कोणीही लोक उपस्थित नव्हते. पोलिसांनी पूजाच्या मृतदेहाचा पंचनामा केला आणि पोस्टमार्टमसाठी नाशिक येथील जिल्हा रूग्णालयात पाठवला. पोस्टमार्टम झाल्यानंतर पूजाच्या नातेवाईकांनी पूजाच्या सासरीच तिच्यावर अंत्यसंस्कार केला. अभिजीत कैलास गवळी (वय २३) याने चांदवड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. माझी बहीण पूजाच्या चारित्र्यावर संशय घेवून व तिला मूल-बाळ होत नाही या कारणावरून तिला मानसिक व शारिरीक त्रास दिला. तसेच कोणत्या तरी धारदार हत्याराने तिला मारहाण करून गंभीर जखमा करून ठार मारले. त्यानंतर तिचा मृतदेह त्यांच्याच घराच्या पाठीमागे असलेल्या शेतात फेकून दिला. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार पती वैभव मोहनदास आहेर, सासरे मोहनदास नारायण आहेर, सासू राजूबाई उर्फ लताबाई आहेर, दीर केशव मोहनदास आहेर, जाऊबाई रूपाली केशव आहेर यांच्याविरोधात चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३२७/२०२५ बी.एन.एस. १०३ (३), ३ (५), ३५१ (२), ३५२ व ८५ कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. पूजाचा विहीरीत पडून मृत्यू झाल्याचा देखावा करण्याचा प्रयत्न तिच्या सासरच्या लोकांनी केला, मात्र तिच्या शरीरावरील गंभीर जखमा सत्य परिस्थिती सांगून गेल्या आहेत. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक तेगबिरसिंग संधू, पोलीस उपअधीक्षक बाजीराव महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कैलास वाघ व त्यांचे सहकारी या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

### बारमध्ये मारहाण करताच वेटर सुडाने ...

कबनुर रस्त्यावरील वैशाली गार्डन येथे दारू पिण्यासाठी जात होते. वैशाली गार्डन मध्ये कागल येथील रोहित कोळेकर हा वेटर म्हणून काम करीत आहे. त्याची आणि अभिनंदन याची चांगली ओळख होती. अभिनंदन हे कोल्हापुर येथील एका बॅंकेत साहेब असल्याचे रोहित कोळेकर याला माहित होते. म्हणून अभिनदंन कोल्हापुरे हे बारमध्ये दारू पिण्यासाठी जेवणासाठी आले की रोहित हा त्यांना चांगली सर्व्हिस देत होता. दारूच्या नशेत अभिनंदन असले की ते रोहितला शिव्या देवून बोलवित होते. याचा राग रोहित कोळेकर याला येत होता. अभिनंदन हे साहेब असल्याने तो ही गप्प बसत होता. दारूच्या नशेत अभिनंदन यांनी शिव्या दिल्या रोहित त्यांना वेळेवर सर्व्हिस देत नव्हता बराच वेळ तो त्यांना वेटिंगवर ठेवत होता. त्यामुळे रागाच्या भरात दोन तीन वेळा अभिनंदन यांनी त्याला समज दिली होती त्याची तक्रार त्यांनी बारच्या मॅनेजरकडे आणि मालकाकडे ही केली होती. त्यामुळे मालकाने आणि मॅनेजरने रोहित याला कान पिचक्या देवून अभिनंदन यांना वेळेवर चांगली सर्व्हिस देण्यास सांगितले. कबनुर फॅक्टरी रोडवर पंकज चव्हाण हा राहयला आहे. तो ही वैशाली बारमध्ये दारू पिण्यास येत असल्याने अभिनंदन याच्या ओळखीचा होता. तसेच ता वेटर पंकज चव्हाण याचा ही जवळचा मित्र होता. अभिनंदन हे दारूच्या नशेत रोहित याला शिव्या देवून बोलवित असल्याचे पंगज चव्हाण याने पाहिले होते. त्याने रोहितला सांगितले की, तु अभिनंदन याला कशाला घाबरतोस तो बॅंकेचा साहेब असला तर त्याच्या पुरता. त्याच्या शिव्या कशाला खातोस. तु त्याला घाबरू नकोस आपण त्याला चांगला एकदा धडा शिकवू.त्यामुळे रोहित ही हल्ली बारमध्ये अभिनंदन आला की त्याच्याकडे लक्ष देत नव्हता.रोहित हा आपल्याकडे लक्ष देत नाही, शिवाय चांगली सर्व्हिस ही वेळेवर देत नाही याचा राग अभिनंदन यांना येत होता. हल्ली ते त्याला टिप ही देत नव्हते. बारमध्ये अभिनंदन दारू प्यायला आले की. ते मुद्दामच रोहितला आपल्या बोटाची चुटकी वाजवून रूबाबात बोलवित होते. तो लवकर त्याच्या टेबलाजवळ आला नाही की त्याला घाण घाण शिव्या देत तुला माज आलाय का? असे विचारत होते. त्यामुळे रोहित कोळेकर हा त्याचेवर चिडून असायचा. त्याच्याकडे खुन्नसी नजरेने पाहयचा. एकंदरीत दोघातील खुन्नस वाढीस लागली होती. खरे तर दोघे ही एकमेकाचे काही दुश्मन नव्हते किंवा दोस्त ही नव्हते. परंतु बारमधील किरकोळ वादावादीतून त्याच्यातील खुन्नस वाढीस लागलेली होती. सोमवार दि.२७ ऑक्टोंबर २०२५ रोजी रात्री नेहमीप्रमाणे अभिनंदन कोल्हापुरे हे वैशाली गार्डनमध्ये जेवायला आणि दारू प्यायला गेले. त्यावेळी त्याचेत आणि रोहित कोळेकर याच्यात किरकोळ कारणातून वादावादी झाली. तु चांगली सर्व्हिस देत नाहीस आणि वेळेवर देत नाहीस म्हणून अभिनंदन यांनी त्याच्याशी वाद घालत असताना रोहित याला शिव्या देत त्याच्या कानाखाली दोन लावली होती. त्यावेळी बारमधील इतर वेटरनी त्याची भांडणे मिटवलेली होती. त्यामुळे रोहितच्या मनाला लागलेले होते. बारमध्येच नेहमी येणाऱ्या पंकज चव्हाणशी त्याने संर्पक साधला आणि अभिनंदन कोल्हापुरे यांनी त्याला मारल्याचे सांगितले.पंकज चव्हाण हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याचेवर इचलकरंजी येथील दोन पोलीस स्टेशनमध्ये दोन गंभीर गुन्हे दाखल आहेत याची माहिती रोहित कोळेकर याला होती. आता त्याची मदत घेऊन अभिनंदन कोल्हापुरे यांना कायमचा धडा शिकवायचा याचा विचार त्याने केला.पंकज चव्हाण याने इचलकरंजी येथील लाल नगर पसिरातात राहत असलेले आपले मित्र विशाल लोंढे आणि आदित्य पवार याच्याशी संपर्क करीत त्यांना कबनुरात बोलावून घेतले. त्यांना ही आता एकाची गेम करायची असून तुम्ही मदत करा असे सांगितले. त्या रात्री पहाटे १.३० वाजणेच्या सुमारास रोहित कोळेकर, पंकज चव्हाण, विशाल लोंढे आणि आदित्य पवार विवेक सांळुखे, ओकांर राऊत यांनी इंदिरा हौसिंग सोसायटीतील अभिनंदन कोल्हापुरे याचे घर गाठले. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी अभिनंदन याच्या घरचा दरवाजा ठोठावला. त्यावेळी नशेत असणाऱ्या अभिनंदन यांनी दरवाजा उघडला.समोर उभ्या असलेल्या पंकज चव्हाण आणि बारमध्ये काम करणाऱ्या रोहित कोळेकर याना बघून काय काम आहे एवढया रात्री तुम्ही माझ्या घरी का आलात असे विचारले. दोघांना ही ते चांगले ओळखत असल्याने त्यांनी जरा चढत्या आवाजात त्याच्याशी वाद घालायला सुरूवात केली. वाद घालत असताना रोहित आणि पंकज चव्हाण यांनी अभिनंदन याचा गळा पकडला आणि मारहाण करीत शिव्या दयायला सुरूवात केली. एवढया रात्री आपल्या घराच्या बाहेर कोणाचा वाद चाललाय आहे हे बघायला अभिनंदन याचे भाऊ डॉ.अभिषेक आणि वडिल जयपाल हे बाहेर आले. बाहेर चौघेजण अभिनंदन याला मारहाण करीत असल्याचे बघून त्यांनी त्याला त्याच्या तावडीतून सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पंकज चव्हाण याने त्यांना सांगितले की हॉटेल गार्डनमध्ये अभिनंदन याने वाद घालत रोहित कोळेकर याला मारहाण केली आहे त्याला आम्ही इचलकरंजी शिवाजी नगर पोलीस स्टेशनला घेऊन जाणार आहोत. डॉ.अभिषेक यांनी त्याचा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला परंतु वाद काही मिटला नाही पंकज चव्हाण, रोहित कोळेकर, विशाला लोंढे आणि अदित्य पवार यांनी अभिनंदन याला घराच्या बाहेर खेचत आपल्या दुचाकीवर जबरदस्तीने बसवून नेले. त्यांनी त्याला कबनुर येथील कोल्हापुर रोडवरील जवळच असणाऱ्या पेट्रोल पंपाजवळ नेले. तेथे त्यांनी त्याला खाली पाडून लाथाबुक्यांनी घाण शिव्या देत मारहाण केली. पंकज आणि विशाल यांनी बाजुलाच पडलेला सिमेंटचा नळा उचलला आणि अभिनंदन याच्या डोक्यात घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्रास झाला. त्यानंतर ही त्यानी बाजुलाच पडलेला दगड ही त्याच्या डोक्यात घातला. या घटनेनंतर त्यांनी तेथून आपल्या मोटार सायकलीवरून पळ काढला परंतु ही घटना जवळच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचे त्यांना माहित नव्हते. पहाटे ३ वाजेपर्यत अभिनंदन हे घराकडे परत आले नाहीत म्हणून डॉ.अभिषेक हे फॅक्टरी रोडवर राहत असलेल्या पंगज चव्हाण याच्या घरी गेले. त्यावेळी त्यांनी पंकज चव्हाण याचा भाऊ सुरज चव्हाण याला घडलेली घटना सांगितली. सुरज चव्हाण याने भाऊ पंकजला फोन लावला असता त्याने आपण रूई फाटा येथे असल्याचे सांगितले. डॉ.अभिषेक यांना शंका आल्याने त्यांनी सुरज चव्हाण याला बरोबर घेऊन अभिनंदन याचा शोध घ्यायला सुरूवात केली. त्यावेळी कबनुर पासून असलेल्या एका पेट्रोल पंपाजवळील रस्त्यावर अभिनंदन याचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह पडला असल्याचे त्यांना दिसून आले. अभिनंदन याच्या डोक्यात सिमेंटचा नळा आणि दगड घातला गेला असल्याने त्याचे डोके फुटले होते. बाजुलाच रक्ताने माखलेला दगड आणि सिमेटचा नळा पडलेला होता. डॉ.अभिषेक यांनी अभिनंदन याला तापासून पाहिले असता अभिनंदन याचा मृत्यु झाल्याचे त्यांनी ओळखले. लागलीच त्यांनी या घटनेची माहिती इचलकरंजी येथील शिवाजीनगर पोलीस स्टेशनला दिली. शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजी गायकवाड स.पो.नी शरद वायदंडे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पो.निरी रविंद्र कळमकर यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह इचलकरंजी येथील इंदिरा गांधी सरकारी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. घटनास्थळावरील पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले असता त्या फुटेजमध्ये काही तरूण अभिनंदन याला मारहाण करीत असल्याचे दिसून येत होते. या घटनेचा तपास शिवाजीनगर पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करीत होते. या घटनेची माहिती पोलीसांना डॉ.अभिषेक कोल्हापुरे यांनी देवून यातील संशयीत आरोपीची नावे पोलीसांना सांगितली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस संशयीत आरोपीच्या मागावर होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला या घटनेतील संशयीत आरोपी हे मंगळवार दि.२८ ऑक्टोंबर रोजी दुपारी ३ वाजणेच्या सुमारास जयसिंगपुर कोल्हापुर रोडवरील चौडेंश्वरी फाटयावर येणार असल्याचे माहिती मिळाली. तेथे सापळा लावून या घटनेतील संशयीतांना ताब्यात घेऊन त्यांना शिवाजीनगर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आल्यावर पोलीस त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्यांनी घडलेली घटना पोलीसांना सांगून आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची लेखी फिर्याद मयत अभिनंदन कोल्हापुरे याचा भाऊ अभिषेक कोल्हापुरे यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी अभिनंदन जयपाल कोल्हापुरे (वय ४४) रा.इंदिरा हौसिंग सोसायटी इचलकरंजी याच्या खुन प्रकरणी रोहित जगन्नाथ कोळेकर (वय २४) रा.श्रध्दा हायस्कुल शेजारी कागल, पंकज संजय चव्हाण (वय २७) रा.फॅक्टरी रोड कबनुर इचलकरंजी,विशाल राजू लोंढे (वय ३१) आणि आदित्य संजय पवार (वय २१) रा.दोघे ही लालनगर विवेक सांळुखे (वय २५) रा.कागल आणि ओकांर राऊत (वय २४) रा.निपाणी यांच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. शिवाजीनगर पोलीसांनी या सर्वांना इचलकरंजी येथील प्रथम वर्ग न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांनी चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला सिमेंटचा नळा ,दगड जप्त आणि गुन्हयात वापरलेली मोटार सायकली जप्त केली. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.निरी.रविंद्र कळमकर याच्या मार्गदर्शनखाली पो.उप.निरी शेष मोरे, अतिश म्हेत्रे, महेश खोत, महेश पाटील, अनिल जाधव, सागर चौगुले यांनी करून संशयीतांना या घटनेनंतर काही तासातच ताब्यात घेतले.या घटनेचा पुढील तपास पो.निरी.शिवाजी गायकवाड याच्या मार्गदर्शनखाली शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. दारूचे व्यसन हे कधी ही घातक असते तरी ही अनेकजण या व्यसनात अडकतात त्यातून दारू पिण्याच्या नादात अनेक गुन्हे घडत असतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## सफाळे आरोग्य केंद्रात नवजात बाळाचा मृत्यू

**सफाळे : वार्ताहर**

सफाळे रेल्वे स्थानकाजवळील कपासे येथील राजश्री पडवळे (३५) या महिलेला बाळंतपणासाठी सफाळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता दुर्दैवाने तिच्या बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रविवारी रात्रीच्या सुमारास राजश्री पडवळे यांना प्रसूती वेदना सुरू झाल्याने कुटुंबीयांनी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, सफाळे येथे दाखल केले. परंतु, तेथील डॉक्टरांनी 'नॉर्मल डिलिव्हरी' होईल असे सांगून त्यांना रात्रभर आरोग्य केंद्रात दाखल करून ठेवले. मात्र सोमवारी सकाळी अचानक रुग्णालयातील डॉक्टरांनी कुटुंबीयांना खाजगी रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला, असा आरोप आहे. यानंतर राजश्री पडवळे यांना तातडीने सफाळे येथील एका खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे तपासणी केल्यावर बाळ मृत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेनंतर पडवळे यांच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त करत प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन संबंधित डॉक्टरांकडे स्पष्टीकरणाची मागणी केली. जर पेशंटची प्रकृती गंभीर होती, तर रात्रभर तिला प्राथमिक आरोग्य केंद्रात का ठेवले? वेळेवर पुढील उपचारासाठी रेफर केले असते, तर बाळाचे प्राण वाचले असते, असा सवाल कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे.तर याबाबत बोलताना सदर महिलेला बाळंतपणासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता दुर्दैवाने बाळंतपणा आधीच बाळाने शी केली. त्यामुळे त्यांना पुढे नेण्याचा सल्ला दिला होता, असे आरोग्य केंद्र प्रशासनाने सांगितले आहे.

## पान ८ वरून....

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ...

पुढील पिढीला संघर्षाची प्रेरणा देत राहील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा आपला सदैव प्रयत्न असून यामाध्यमातून समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी काम करीत असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले. विश्र्वशांती बुद्धविहार परिसरात नागरिक, मुलांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बगीचा आणि किडो वंडर लॅंड व पार्क विकसित केले जाणार आहे, असे आमदार श्री. बनसोडे म्हणाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेला संदेश आमदार अमोल मिटकरी यांनी यावेळी वाचून दाखविला. उदगीरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात नमूद केले, तसेच अतिवृष्टीने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी आपल्या संदेशात दिली. प्रा. जोगेंद्र कवाडे, रामचंद्र तिरुके यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती अंबेकर यांनी केले. यावेळी गायक आदर्श शिंदे यांच्या भिमगितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### 'आदर्श मैत्री फाउंडेशन'तर्फे शेतकऱ्यांस...

सर्व संचालकाच्या सहकार्यातून होत असल्याचे मत प्रा सुधाकर तोडकर यांनी यावेळी व्यक्त केले. आदर्श मैत्री संस्था ही नेहमीच गोरगरीब वंचितांच्या पाठीशी उभे राहणारे संस्था आहे यामधील सर्व संचालक सामाजिक बांधिलकी जपणारे असून समाजातील तळागाळातील लोकांची नाळ जोडलेले आहेत त्यामुळे त्यांना समाजातील सर्वच प्रश्र्नांची जाणीव आहे आणि त्या जाणिवेतूनच समाज उपयोगी असे अनेक उपक्रम ते घेत असतात असे मत समाज कल्याणचे उपायुक्त अविनाश देवसटवार साहेब यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी नायब तहसीलदार गणेश सरोदे प्राचार्य निलेश राजमाने सोनू डगवले यांच्यासह उपस्थित आपत्तीग्रस्त शेतकरी व महिला शेतकरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास समाज कल्याणचे विभागीय उपायुक्त अविनाश देवसरकर साहेब नायब तहसीलदार गणेश सरोदे आदर्श मैत्री फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष बिराजदार फाउंडेशनचे संचालक प्रा शिवराज मोठेगावकर, पत्रकार शशिकांत पाटील, प्राचार्य निलेश राजमाने, सुधाकर तोडकर, विवेक सौताडेकर, महेश तोडकर सोनू डगवाले, प्रमोद भोयरेकर, संभाजी नवघरे, प्रवीण सूर्यवंशी संपत जगदाळे, सितम सोनवणे, मदन भगत, ज्योतीराम कुमठे, कुमार शिंदे, सुदर्शन लकडे यांच्यासह शेतकरी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी नवघरे यांनी केले तर आभार शशिकांत पाटील यांनी मानले.

### सरदार वल्लभभाई पटेल जयंतीदिनी...

आयोजन केले होते. ह्या रन फॉर युनिटी करिता अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांच्यासह २ सपोनी, ५ पोलीस उपनिरीक्षक, २ श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, ४७ पोलिस अंमलदार, ७ मसुबचे जवान, ५ पोलीस पाटील आदी रन फॉर युनिटी मध्ये सहभागी झाले होते. तसेच यावेळी वृक्षारोपण करून जनजागृती करण्यात आली.

### 'पालघर सांसद खेळ महोत्सवात' सव्वा ...

गटाकरीता आयोजित केल्या जाणार आहेत. या महोत्सवामध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, लंगडी, वैयक्तिक मैदानी स्पर्धा, मॅरेथॉन, बॅडमिंटन, योगा अशा विविध क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात येणार असून या प्रत्येक खेळात वयोगटांमध्ये विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड, वसई व पालघर या आठही तालुक्यांमधील जिल्हा परिषद शाळा, आश्रम शाळा, खाजगी शाळा, कनिष्ठ विद्यालय यामधील विद्यार्थ्यांना या महोत्सवात प्रत्यक्ष सहभाग घेता येणार असून सुमारे सव्वा सहा लाख खेळाडूंनी आजवर त्यामध्ये नोंदणी केली आहे. स्पर्धा सुरू होईपर्यंत खेळाडूंना त्यांची नोंदणी करणे शक्य राहणार असल्याची माहिती पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी पत्रकारांना दिली. देशातील खासदारांमार्फत विविध ठिकाणी अशाच प्रकारच्या स्पर्धा होत असून पालघर मधील स्पर्धकांचा नोंदवण्यात आलेला सहभाग हा राष्ट्रीय पातळीवर एक विक्रम असल्याचे सांगत पालघरसाठी या स्पर्धा ऐतिहासिक ठरणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या स्पर्धांच्या आयोजनासाठी सुमारे पावणेदोन कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून हा निधी दानशूर व्यक्ती, उद्योग समूह तसेच उद्योगांच्या सामाजिक दायित्व फंडातून उभारला जाणार असून या स्पर्धांच्या आयोजनासाठी १५ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. स्पर्धेच्या ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त तसेच खेळाडूंसाठी आरोग्य व्यवस्था केली जाणार असून दूरवरून येणाऱ्या खेळाडूंसाठी वाहतूक व्यवस्था व आवश्यकता भासल्यास निवासाची व्यवस्था केली जात असल्याची माहिती खासदार यांनी यासंदर्भात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. २०३६ च्या ऑलम्पिक करिता यजमानपद मिळवण्यासाठी भारत प्रयत्न करत असताना विविध खेळांमधील स्पर्धकांचा दर्जा उंचावण्यासाठी स्थानीय पातळीवर खेलो ग्राम योजना व इतर स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. याखेरीज वेगवेगळ्या प्रशिक्षकांना विकसित केले जात असून ग्रामीण भागातील क्रीडा गुण असणाऱ्या युवकाला वाव मिळण्यासाठी केंद्रीय पातळीवर प्रयत्न केले जात असून व्यावसायिक खेळाडू तयार व्हावेत या उद्देशाने या व इतर स्पर्धांचे आयोजन केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. पालघर जिल्ह्यातील नागरिकांनी या खेळ महोत्सवात सहभागी होऊन महोत्सव यशस्वी करावा असे आवाहन खासदार डॉ. सवरा यांनी केले. या महोत्सवाच्या उद्घाटनासाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण व आदिवासी विकास मंत्री अशोक उईके उपस्थित राहणार असून जिल्ह्यातील आमदार व विविध क्षेत्रातील पदाधिकारी यांच्यामार्फत सहभागी खेळाडूंना प्रोत्साहित केले जाणार आहे. या स्पर्धेच्या समारोपय समारंभाला पालकमंत्री गणेश नाईक उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी या प्रसंगी दिली.

### डॉ. संपदा मुंडे यांना मरणोत्तर न्याय ...

हक्काच्या लढाईसाठी जिल्हाध्यक्ष ओनील अल्मेडा यांच्या मार्गदर्शनाखाली वसई विरार जिल्हा कॉंग्रेस कमिटी तसेच युवक कॉंग्रेस कमिटीतर्फे शेकडो लोकांच्या सहभागातून हा कॅन्डल मार्च राष्ट्रीय महामार्ग येथून पेल्हार पोलीस चौकीपर्यंत काढण्यात आला होता. शेकडो कार्यकर्त्यांनी डॉ. संपदा मुंडेंना श्रद्धांजली वाहत, मरणोत्तर तिला न्याय मिळवून देण्यासाठी पेल्हार पोलीस स्टेशनमार्फत सरकार दरबारी राज्यपाल यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस हरिश्चंद्र थोरात, डॉ. दिनेश कांबळे, प्रदेश सचिव कॅ. निलेश पेंढारी, युवक कॉंग्रेस कोकण प्रभारी दिप्तेश परब, प्रदेश युवक कॉंग्रेस सरचिटणीस ड. हितेश थोरात, किरण शिंदे, संदीप कनोजिया, तबारक शेख, अकबर खान, मकसूद मणियार, अन्वर, सोहेल चौधरी, सज्जाद अन्सारी, श्रीमती. आलिया, स्मिता आंग्रे, डेव्हिड यांच्यासह शेकडो कॉंग्रेस कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### औसा-तुळजापूर महामार्गावरील नूतन ...

आजोबांनी, वडील-काकांनी केलेल्या दैदिप्यमान कार्याचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी युवा पिढीचा प्रतिनिधी म्हणून रोनककडे आली आहे. समाजाकडून आपल्याला जे मिळाले आहे, त्यातून सर्वांच्या आशिर्वादाने हा व्यवसाय यशस्वीपणे चालेल असा विश्र्वासही गहिनीनाथ महाराजांनी व्यक्त केला. यज्ञेश धुरी यांनी यावेळी बोलताना सीएनजी पर्यावरणपूरक गॅसचे महत्व विशद केले. सीएनजी गॅस ची संपूर्ण माहिती दिली तसेच लातूर विभागातील हे ४१ वे सीएनजी स्टेशन असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे रोनक सीएनजी स्टेशन लवकरात लवकर ऑनलाईन करण्यात येणार असल्याची घोषणा केली. लक्ष्मीरमण लाहोटी, डॉ. चेतन सारडा, सीए संजय अग्रवाल, महेश बिलीगुडी, कमलकिशोर अग्रवाल यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. नरेंद्र अग्रवाल, कमलकिशोर अग्रवाल, रोनक अग्रवाल व अग्रवाल परिवारातील सदस्यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोनक अग्रवाल यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या सीएनजी स्टेशनच्या उभारणीसाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे ऋण व्यक्त केले. ग्राहकांच्या सेवेत आजपासून आपल्या सीएनजी पंपावर उत्कृष्ट सेवा देण्याची हमी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चक्षुपाल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. माधुरी अग्रवाल यांनी केले. याप्रसंगी आदिनाथ सांगवे, दिलीप माने, पी.के. पाटील, जयेश बजाज, अॅड.श्रीकांत उटगे, रमाकांत स्वामी, गिरीश कुलकर्णी, व्यंकटेश पुरी, डॉ. हरिप्रसाद सोमाणी, डॉ. संजय शिवपूजे, डॉ. ओमप्रकाश भोसले, व्यंकट गर्जे, विवेक रेड्डी, हुकूमचंद कलंत्री, नरेश पाटील चाकूरकर, प्रा. रामेश्र्वर बद्दर, सुनील माने यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरोग्य, शिक्षण, राजकारण, सहकार क्षेत्रात ठाकूर कुटुंबाचे योगदान मोठे -विलास चोरघे



**विरार : वार्ताहर**

आरोग्य, शिक्षण, राजकारण, सहकार क्षेत्रात ठाकूर कुटुंबाचे योगदान मोठे आहे. जेष्ठ नागरिकांना आरोग्यासाठी मदत करण्याचे व्रत ठाकूर कुटुंबाने घेतले आहे, असे प्रतिपादन माजी नगरसेवक विलास चोरघे यांनी आज विरार येथे केले. भास्कर वामन ठाकूर यांच्या पुण्यतिथी निमित्त आज सकाळी श्री जीवदानी देवी संस्थान संचालित भास्कर वामन ठाकूर शिक्षण संकुल, सहकार नगर येथे स्व.भास्कर वामन ठाकूर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले व श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर श्री जीवदानी देवी संस्थान विरार येथे सकाळी १०.३० वाजता स्व.भास्कर वामन ठाकूर आरोग्य सेवा ट्रस्टचे उदघाटन करून ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वॉकर स्टिक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला जीवदानी देवी ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप तेंडुलकर, उपाध्यक्ष पंकज ठाकूर, माजी नगरसेवक विलास बंधू चोरघे, डॉ.वसंत मंगेला, जयप्रकाश चोधरी, रोम्मी ठाकूर, अॅड.नयन जैन, किरण ठाकूर, माजी नगरसेवक हार्दिक राऊत, अमर कोंडाळकर आणि अमित कोंडाळकर उपस्थित होते. यावेळी १२५ स्टिकसचे वाटप केले.

# विविध मागण्यांसाठी आदिवासी बांधवांचा वसई-विरार महापालिकेवर ‘धडक मोर्चा’




**विरार : वार्ताहर**

वसई विरार शहराच्या विविध भागात असणाऱ्या आदिवासी बांधवांनी शुक्रवारी महापालिकेच्या मुख्य कार्यालयाबाहेर आंदोलन केले. मूलभूत सुविधांचा अभाव, मालकी हक्कांच्या जागांवर झालेले अतिक्रमण, सरकारी योजनांचा न मिळणारा लाभ अशा विविध मागण्या आंदोलकांनी केल्या. वसई विरार शहरात विविध भागात मोठ्या प्रमाणावर आदिवासे पाडे आहेत. २००९ नंतर यातले बहुतांश आदिवासी पाडे हे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आले. पण, अनेक वर्षानंतरही या पाड्यात राहणाऱ्या आदिवासी नागरिकांना पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सुसज्ज शाळा आणि आरोग्य केंद्रे, शालेय शिक्षण आणि नोकरीसाठी दिल्या जाणाऱ्या सवलती अशा विविध सुविधांचा अभाव सहन करावा लागत आहे. महापालिकेकडे वारंवार तक्रार करूनही वर्षोनुवर्षे हे मुद्दे प्रलंबित असल्यामुळे आदिवासी एकता परिषद वसई तालुका यांच्या नेतृत्वात आंदोलन पुकारण्यात आले आहे. सकाळी विरार पश्चिमेच्या जकात नाका परिसरातून या आंदोलनाची सुरुवात झाली. तर घोषणाबाजी करत वसई विरार महापालिकेच्या मुख्यालयासमोर आंदोलकांनी ठिय्या मांडला आहे. या आंदोलनामध्ये वसई तालुक्यातील १०८ आदिवासी पाड्यातील चारशे ते पाचशे आदिवासी आंदोलक सहभागी झाले असून या आंदोलनात महिलांची संख्या लक्षणीय होती. यावेळी आदिवासी एकता परिषद, वसई तालुका अध्यक्ष दत्ता सांबरे यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, २०१७ पासून आम्ही अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांसाठी झगडत आहोत. अनेक निवेदने देऊनही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे, आम्ही आयुक्तांना आमच्या मागण्यांसंबंधीचे निवेदन देणार आहोत आणि जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हा मोर्चा सुरूच राहील. असे आंदोलन कर्त्यांनी सांगितले. आंदोलकांनी शहरातील भूमाफियांकडून आदिवासींच्या राहत्या घराच्या व वहिवाटीच्या जागांवर अतिक्रमण झाल्याचा गंभीर आरोप केला. तसेच, ग्रामपंचायतीच्या काळात आमच्या नावावर असलेल्या जागांची घरपट्टी महापालिकेने रद्द करून त्या जागा अनधिकृत ठरवल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

## विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनतर्फे रूट मार्च



**उल्हासनगर : वार्ताहर**

उल्हासनगर मध्ये आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी तसेच संभाव्य दंगलींना आळा घालण्यासाठी विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनतर्फे दंगा नियंत्रण योजना व रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. हा रूट मार्च वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. मोहिमेत एकूण ५ अधिकारी, ४८ पोलीस कर्मचारी, पीसीआर व्हॅन, सीआरएम मोबाईल आणि म्बुलन्स सहभागी होती. मार्चचा मार्ग विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन श्रीराम चौक,पेन्सिल फॅक्टरी, व्हीटीसी ग्राउंड, ओटी चौक,पुन्हा विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन असा होता. या रूट मार्चद्वारे विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनचे वपोनि. अशोक कोळी यांनी नागरिकांना शांतता, सुरक्षा आणि सामाजिक सलोखा राखण्याचा संदेश दिला. शहरात कायदा सुव्यवस्था आबादीत राखायची असेल तर पोलिसांचा धाक असणे गरजेचे आहे. महाराष्ट्र पोलिसांचं ब्रीदवाक्यच आहे, सद्रक्षणाय खलनिग्रहणाय याचा अर्थ असा आहे की, महाराष्ट्र पोलीस सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दुष्टांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटिबद्ध आहेत. तसेच आगामी निवडणुकांदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णतः सज्ज असल्याची सूचना देण्यात आली.

## लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडून वाडा येथे जनजागृती



**वाडा : वार्ताहर**

सर्वसामान्य नागरिकांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे थेट तक्रार करता यावी, लाचलूचपत प्रतिबंधक विभागा विषयी माहिती मिळावी यासाठी वाडा येथे लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनजागृती मोहीम राबवली. नागरिकांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसरण करून लाचलूचपत प्रतिबंधक विभागा बद्दल असलेले गैरसमज दूर करण्यासाठी पोलिस उपअधीक्षक दादाराम करांडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष जनजागृती मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत जर कोणत्याही सरकारी कामासाठी कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी स्वतः किंवा इतरांमार्फत लाचेची मागणी करत असेल, तर नागरिकांनी त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा अशा आशयाची माहितीपत्रके नागरिकांना वाटप करण्यात आली, या माहिती पत्रकावर लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे टोल-फ्री नंबर, हेल्पलाईन, ई-मेल आयडी, वेबसाइट इत्यादीची माहिती देण्यात आली आहे. ज्यामुळे नागरिक कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराची तक्रार थेट नोंदवू शकतील. वाडा येथे आयोजित कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते अनंता वनगा, कर्मचारी विकास कांबळे, शिक्षक अजय भोईर, वकिली क्षेत्रातून नितेश म्हसे, कपिल पाटील व शाळा, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उपस्थितांचे प्रश्न, सूचना ऐकूण घेऊन त्यांच्या सर्व शंकांचे निरसन व प्रश्नांची उत्तरे अधिकाऱ्यांनी दिली. लाचलूचपत प्रतिबंधक विभाग हे नागरिकांच्या हक्कांसाठी काम करणारे एक महत्वाचे शासकीय यंत्रणा आहे. अनेकांना या विभागाबद्दल गैरसमज होते, पण या मोहिमेमुळे ते दूर होत आहेत असे मत पोलीस उपअधीक्षक दादाराम करांडे यांनी व्यक्त केले.

### विरार तरणतलाव मृत्यू प्रकरण
## प्रशिक्षक, व्यवस्थापकासह तिघांवर बोळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**विरार : वार्ताहर**

विरार पश्चिमेच्या यशवंतनगर भागातील अमय क्लब येथील तरणतलावामध्ये साडेतीन वर्षीय ध्रुव बिष्ट या मुलाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आता तरणतलावाच्या ठिकाणी असलेले दोन प्रशिक्षक व तेथील व्यवस्थापक अशा तिघांच्या विरुद्ध बोळींज पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. विरार पश्चिम येथील यशवंत नगर साधे अमेय क्लासिक क्लब आहे. या क्लबमध्ये विरार मध्ये राहणारा ध्रुव चंदनसिंह बिष्ट हा मंगळवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास आपल्या आईसोबत अमेया क्लबच्या तरणतलावात गेला होता. याच दरम्यान त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. सुरवातीला बोळींज पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली होती. याबाबत ध्रुवची आई रेणू सिंह बिष्ट (३७) हिने बोळींज पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. यात त्या ठिकाणी असलेल्या सुरक्षा रक्षक यांनी लक्ष न दिल्याने माझ्या मुलाचा मृत्यू झाला असल्याचे तक्रारीत सांगितले आहे. या मिळालेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आता त्प्रशिक्षणाकरीता असलेले प्रशिक्षक कौस्तुभ मेहेर, हर्ष शेट्टी तसेच व्यवस्थापक प्रविण झोरे यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. वसई विरार शहरात असलेले तरण तलाव दिवसेंदिवस धोकादायक ठरू लागले आहेत. या तरण तलावात बुडून मृत्यू होणाऱ्यांची संख्या देखील वाढू लागली आहे. तरण तलावाच्या ठिकाणी जीवरक्षक नसणे, सुरक्षेच्या नियमांचे पालन न होणे यामुळे तरण तलावात मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले आहे.

## विविध मागण्यांसाठी तरुणांचे आमरण उपोषण



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील आमगाव ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या एका इंजिनिअरिंग कंपनीत व्यवस्थापनाच्या मुजोरीने स्थानिक तरुणांना रोजगार नाकारण्यात आला आहे. ग्रामपंचायतीने नाहरकत दाखले देताना स्थानिकांना रोजगार द्यावा असे आश्वासन घेऊनही कंपनी स्थानिक मराठी तरुणांना रोजगार देत नसल्याने तरुण संतप्त झाले आहेत. याशिवाय महावितरणने पथदिवे काढून कारवाई केल्या विरोधात तसेच ग्रामपंचायत भ्रष्टाचाराच्या विरोधात चुकीचा अहवाल पाठविणे व चांगले रस्ते दुरुस्तीच्या नावाने उखडून काढणे अशा अनेक समस्यांचा जाब विचारण्यासाठी काही तरुणांचे तहसीलदार कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू आहे. आमगाव हद्दीत असणाऱ्या इंजिनिअरिंग कारखान्यात व्यवस्थापक अतिशय मुजोरी करीत असून जवळपास ४० ते ५० तरुणांनी रोजगाराची मागणी करूनही कुणाला काम मिळत नसल्याने तरुण संतापले आहेत. स्थानिक व मराठी असल्याचा राग मनात धरून व्यवस्थापन रोजगार देत नसल्याचे तरुणांचे म्हणणे असून स्थानिकांवर होणारा हा अन्याय दुर्दैवी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार झाला असून त्याचे पुरावे देऊनही अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना चुकीचा अहवाल पाठविल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील काही रस्ते मंजूर असल्याची बतावणी करून खोदकाम करण्यात आले. प्रत्यक्षात रस्ते मंजूर नसून खोदकाम का करण्यात आले असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. ग्रामपंचायत हद्दीत लाखों रुपयांचा खर्च करून बसविण्यात आलेले पथदिवे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी काढून नेले असून याविरोधात नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप करून महावितरण अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायत हद्दीतील काही तरुण याविरोधात मंगळवारपासून आमरण उपोषण करीत असून ठोस कारवाई होईपर्यत आंदोलन मागे घेतले जाणार नाही असा इशारा देण्यात आला आहे.

## मुंबई विभागीय शालेय बेसबॉल स्पर्धा संपन्न

**पालघर : वार्ताहर**

पालघरच्या स.तू.कदम विद्यालयाच्या, प्रांगणात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पालघरच्या वतीने, मुंबई विभागीय शालेय बेसबॉल स्पर्धा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा क्रीडा सुहास व्हनमाने, मुख्य कार्यकारी क्रीडा अधिकारी, गिरीश इरणक जीवन विकास संस्थेचे, कार्याधक्ष प्रणव कदम, कोमल कदम दांडी हायस्कूल मुख्याध्यापिका मनिषा तारवी, संघटनेचे राज्य सह सचिव अशोक सरोदे जिल्हा संघटनेचे पदाधिकारी नितीन म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा झाला. या विभागीय स्पर्धेदरम्यान मुंबई विभागाच्या १३ संघानी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक पालघर जिल्हा, द्वितीय क्रमांक मुंबई शहर जिल्हा, तृतीय क्र. मुंबई उपनगर जिल्हा तर १९ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये प्रथम क्रमांक मुंबई उपनगर जिल्हा, द्वितीय क्रमांक वसई विरार महानगरपालिका, तृतीय क्रमांक मुंबई शहर जिल्हा यांनी पटकावला १७ वर्षे वयोगटात मुलांमध्ये, प्रथम क्रमांक रायगड जिल्हा द्वितीय क्रमांक पालघर जिल्हा तृतीय क्रमांक मुंबई शहर जिल्हा यांनी पटकावला. तर, मुलींच्या सामन्यांमध्ये प्रथम क्रमांक रायगड जिल्हा, द्वितीय क्रमांक नवी मुंबई मनपा, तृतीय क्रमांक मुंबई उपनगर जिल्हा या स्पर्धेतून विजयी संघ महाराष्ट्र राज्य स्पर्धेकरिता मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

## बोईसर येथे तालुका अधिकाऱ्यांसाठी शाश्वत विकास ध्येय विषयक थीमॅटिक प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**बोईसर : वार्ताहर**

शाश्वत विकास ध्येयांची (Sustainable Development Goals - SDG) प्रभावी अंमलबजावणी स्थानिक स्तरावर व्हावी, यासाठी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद पालघरतर्फे दोन दिवसीय थीमॅटिक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पाचमार्ग, बोईसर येथील सॉलिटिअर येथील सभागृहात झालेल्या या प्रशिक्षणात जिल्ह्यातील सर्व तालुका अधिकारी, गटविकास अधिकारी आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रशिक्षणाचे उद्घाटन करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अशोक पाटील यांनी शाश्वत विकास ध्येयांची सखोल ओळख करून दिली. ते म्हणाले, ही ध्येयं केवळ अहवालापुरती मर्यादित न राहता नागरिकांच्या जीवनमानात प्रत्यक्ष बदल घडविणारी ठरावीत. प्रशासनातील प्रत्येक घटकाने SDGची आत्मसात करून अंमलबजावणीत नव्या दिशा आणल्या पाहिजेत. प्रवीण प्रशिक्षक भरत हजारे (यशदा, पुणे)



यांनी गरिबीमुक्त आणि उपजीविका सक्षम गाव या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, वंचित व उपेक्षित घटकांचे जीवनमान उंचावणे हेच खऱ्या अर्थाने विकासाचे प्रतीक आहे. विशाखा वानखेडे (यशदा, पुणे) यांनी आरोग्यदायी गाव, बालस्नेही गाव व सामाजिक न्याययुक्त गाव या विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. विजय अंबात (यशदा, पुणे) यांनी जलसमृद्ध, हरित व स्वच्छ गाव या संकल्पनांवर सविस्तर मार्गदर्शन करून पायाभूत सुविधा निर्मितीचा शाश्वत दृष्टिकोन स्पष्ट केला. दुसऱ्या दिवशी जिल्हा पेसा समन्वयक विकास पाटील यांनी सुशासनयुक्त गाव या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितले की, २०३० पर्यंत संतुलित, समावेशक आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी प्रत्येक स्तरावर उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि समन्वय अत्यावश्यक आहे. प्रशिक्षणादरम्यान गरिबी निर्मूलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सर्वांसाठी आरोग्य, स्वच्छ पाणी व स्वच्छता, शाश्वत शेती, हवामान बदल नियंत्रण, लिंग समानता, हरित ऊर्जा आणि सशक्त संस्थात्मक शासन या महत्त्वाच्या SDG विषयांवर तज्ज्ञांनी सखोल चर्चा केली. गटचर्चा, केस स्टडी आणि प्रेझेंटेशनच्या माध्यमातून व्यावहारिक अंमलबजावणीसाठी अधिकारी सक्षम बनविण्यात आले. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश तालुका अधिकाऱ्यांना SDG Action Plan प्रभावीपणे राबविण्यास सक्षम करणे हा होता. स्थानिक गरजांनुसार योजना आखणे, आकडेवारीच्या आधारे परिणाम मोजणे आणि विकास सूचकांक सुधारण्यासाठी कृती आराखडे तयार करणे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व अधिकारी आणि विभागांना त्यांच्या क्षेत्रात SDG चॅम्पियन म्हणून जबाबदारी स्विकारण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे जिल्ह्याच्या विकास नियोजनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास सहभागी अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनासाठी एम.एन.गढरी, सहा. गटविकास अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद पालघर, डिंपल पाटील (जिल्हा व्यवस्थापक, RGSA) मंगेश तामोरे (लेखापाल व मूल्यमापन सनियंत्रक) तसेच ग्रामपंचायत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## सहा महिन्यात १३१ टँकर्सवर कारवाई

**वसई : वार्ताहर**

वसई-विरार ,नालासोपारा शहरांत टँकर चालकांच्या बेदरकार आणि निष्काळजीपणामुळे गेल्या वर्षभरात अनेक लहान मोठ्या अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या अपघातात काही नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. तर, काहींना जीव देखील गमवावा लागला आहे. नागरिकांच्या वाढत्या तक्रारींनंतर परिवहन विभागाने कारवाईची मोहीम सुरु केली होती. शहरात सहा महिन्यात १३१ टँकरवर कारवाई करीत ७ लाख ८३ हजारांचा दंड वसूल केला आहे.वसई-विरार शहरात अनेक टँकर चालक सर्रासपणे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करत वाहने चालवतात. यामुळे सातत्याने टँकर अपघाताच्या घटना घडत आहेत. यापूर्वी अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी चालक-मालकांच्या बैठका घेऊन सूचना दिल्या होत्या, पण काही दिवसांनंतर नियम पुन्हा पायदळी तुडवले जातात. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे दिवसेंदिवस मूलभूत सुविधांवरील ताण वाढत चालला आहे. अशातच काही भागात असणारी पाणीटंचाई आणि अनियमित पाणीपुरवठ्यामुळे टँकरची मागणी वाढली आहे. या मागणीचा गैरफायदा घेत अनेक नादुरुस्त, कालबाह्य आणि जुनाट टँकर देखील रस्त्यावरून धावत आहेत. या बेदरकार टँकरमुळे २२ सप्टेंबर रोजी विरार टँकर अपघातात प्रताप नाईक (५५) यांचा मृत्यू झाला होता.

## बोईसरमधील कार्पेट कारखान्याला आग; चार कामगार गंभीर जखमी




**बोईसर : वार्ताहर**

बोईसर जवळील बेटेगाव येथे कार्पेट कारखान्याला आग लागल्याची घटना घडली. आगीमध्ये चार कामगार गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आगीची खबर मिळताच तारापूर अग्निशमन दलाचे दोन बंब आणि खाजगी टँकर घटनास्थळी दाखल झाले. कारखान्यामध्ये मोठ्या प्रमाणात ज्वलनशील साहित्य असल्यामुळे संध्याकाळी उशिरापर्यंत आग विझवण्याचे प्रयत्न सुरू होते. बोईसर जवळील बेटेगाव ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या रिस्पॉन्सिव्ह या कार्पेट आणि दोरखंड उत्पादन बनविणाऱ्या कारखान्याला शुक्रवारी पाच वाजेच्या सुमारास भीषण आग लागली. कारखान्यामध्ये लागलेल्या आगीमुळे चार कामगार गंभीर जखमी झाले आहेत. चार पैकी तीन कामगारांना ऐरोली येथील नॅशनल बर्न सेंटर या रुग्णालयात उपचारासाठी संदर्भित करण्यात आले असून एका कामगारावर बोईसर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कारखान्याला आग लागल्याची खबर मिळताच तारापूर अग्निशमन दलाचे दोन बंब तातडीने घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्याचप्रमाणे दोन टँकरच्या मदतीने आग विझवली जात आहे. कारखान्यात ज्वलनशील साहित्याचे उत्पादन होत असल्यामुळे आगीची तीव्रता अधिक असून अग्निशमन दलाचे जवान आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करत असून घटनास्थळी बोईसर पोलीस ठाण्याचे अधिकाऱ्यां कर्मचारी उपस्थित आहेत. रिस्पॉन्सिव्ह या कारखान्यात वर्षभरात आग लागल्याची दुसरी घटना घडली असून यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित झाला आहे.

## अनोळखी मयत पुरुष इसमाच्या नातेवाईकांच्या शोध

**विरार : वार्ताहर**



विरार पश्चिमेकडील बोळीज पोलीस ठाणे हद्दीत एका अनोळखी मयत पुरुष जातीच्या इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आलम हाश्मी राहणार डोंगर पाडा विरार वेस्ट. यांनी खबर दिली की विरार पश्चिमेकडे स्कायवाच्या खाली एक अनोळखी इसम उताणे स्थितीत पडलेला दिसून आला आवाज देऊनही उठवण्याचा प्रयत्न केला असता त्याच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नव्हता म्हणून त्याच्या तोंडावर पाणी मारू उठवण्याचा प्रयत्न केला तरीही काही प्रतिसाद देत नव्हता म्हणून पोलिसांना तातडीने कळविण्यात आले पोलीस घटनास्थळी येऊन उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय विरार येथे घेऊन गेले असता डॉक्टरांनी त्या तपासून पाहिले व त्याला मृत घोषित केले. मयत इसमाचे वर्णन वय अंदाजे ५० अंगावर काळ्या रंगाची टी-शर्ट घातलेला, डाव्या हाताच्या मनगटावर हनुमान असे गोंदलेले वर्णन आहे. अशा वर्णाचा इसमाबद्दल कोणास काही माहिती मिळाली तर पोलीस पोलीस ठाण्यात संपर्क करावे याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन पवार करीत आहेत.

03 TO 09 NOVEMER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 11/1/2025 8:57 PM Page 1



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समृद्ध लोकशाहीचा पाया रचला –मंत्री बाबासाहेब पाटील



**उदगीर : वार्ताहर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अंधारलेल्या समाजाला समतेचा दिवा देवून लोकशाहीच्या मार्गाने चालण्याची दिशा दाखवली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या समृद्ध लोकशाहीचा भक्कम पाया रचला. त्यामुळे आज प्रत्येक समाज घटकाला विकासाची समान संधी उपलब्ध झाली असल्याचे प्रतिपादन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. उदगीर येथील नांदेड ते बिदर मार्गालगत उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व स्मारकाच्या लोकार्पण समारंभानिमित्त गुरुवारी सायंकाळी तालुका क्रीडा संकुल येथे उपस्थितांना मार्गदर्शन करताना सहकार मंत्री श्री. पाटील बोलत होते. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार अमोल मिटकरी, आमदार संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे, भदंत उपगुप्त महाथेरो, भंते पय्यानंद, भंते नागसेन बोधी, शिल्पा बनसोडे, माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, उषा कांबळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सोमानाथ जाधव, भरत चामले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या निर्मितीसोबतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती, सिंचन प्रकल्प, अर्थकारण, समाजकारण यासारख्या विविध क्षेत्राशी निगडीत विषयांवर आपले विचार मांडले केले. त्यांचे हे विचार आजही आपल्याला मार्गदर्शक ठरत आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा आणि स्मारकाचे उद्घाटन उदगीर येथे झाले असून त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्यासाठी हे स्मारक व पुतळा प्रेरणा देईल, असा विश्र्वास सहकार मंत्री श्री. पाटील यांनी व्यक्त केला. उदगीर शहरातील विश्र्वशांती बुद्धविहार परिसरातील सुशोभिकरण आणि रस्ते विकास कामांमुळे नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होईल, असे ते म्हणाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ नाव नाही, तर एक प्रेरणा आहे, एक चेतना आहे. त्यांचा पूर्णाकृती पुतळा उदगीर शहरात उभारण्यात आला असून हा पुतळा ...पान ६ वर

# 'आदर्श मैत्री फाउंडेशन'तर्फे शेतकऱ्यांस खते बियाणांचे वाटप



**लातूर : वार्ताहर**

नुकत्याच झालेल्या आसमानी संकटामुळे हतबल झालेल्या २५ शेतकऱ्यांना मदतीचा हात नव्हे तर कर्तव्य समजून त्यांना खत बी बियांचे वाटप आदर्श मैत्री फाउंडेशन च्या वतीने आज करण्यात आले सध्या निसर्ग शेतकऱ्यावर कोपलेला दिसत आहे, अशा परिस्थितीत शेतकरी हतबल होऊन टोकाचे पाऊल उचलत आहेत, अशा शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी, त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्यासाठी आम्ही आदर्श मैत्रीच्या वतीने मदत नव्हे तर कर्तव्य समजून त्यांना हरभरा व गहू बियाण्याचे बॅग व खत वाटप आज करत आहोत. याशिवाय भविष्यात तुमची मुले उच्च शिक्षण घेत असतील त्यांना काही अडचण असेल तर त्यासाठीही सर्वतोपरी मदत करणार असल्याचे मत फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी प्रस्ताविकात व्यक्त केले. हा उपक्रम संपूर्ण लातूर वाशियांच्या सहकार्यातून नेटिजन्स फाउंडेशन स्कूल विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जमवलेल्या मदत फेरीच्या निधीमधून त्याचबरोबर फाउंडेशनच्या...पान ६ वर

# पालघर पोलीस दलाच्या वतीने वाडा येथे 'रन फॉर युनिटी'




**वाडा : वार्ताहर**

भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी' या एकात्मतेच्या धाव कार्यक्रमाचे आयोजन पालघर पोलीस दलाच्या वतीने वाडा पोलीस ठाणे अंतर्गत आयोजित करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक, विद्यार्थी तसेच पोलीस दलाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक (कोकण विभाग) संजय दराडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख उपस्थित होते. रन फॉर युनिटी' या स्पर्धेत इयत्ता ५वी ते ८वी, ९वी ते १०वी तसेच महिला आणि पुरुषांचा खुला गट असे चार गट ठेवण्यात आले होते. वाडा शहरातून सुरू झालेल्या या एकात्म धावीत शेकडो विद्यार्थी, शिक्षक, पोलीस पाटील, नागरिक तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. यावेळी बोलताना डॉ. दराडे म्हणाले, भारताच्या अखंडतेचे आणि एकतेचे प्रतीक असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजात एकात्मतेचा संदेश पोहोचवणे हीच खरी श्रद्धांजली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाडा पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक शैक्षणिक संस्था यांनी सक्रिय सहभाग घेतला. रन फॉर युनिटी'च्या माध्यमातून देशाच्या एकतेचा, बंधुत्वाचा आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त पेल्हार पोलीस ठाण्यात 'रन फॉर युनिटी'चे आयोजन



**नालासोपारा : वार्ताहर**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पेल्हार पोलीस ठाण्याने राष्ट्रीय एकता आणि जनजागृतीला चालना देण्यासाठी रन फॉर युनिटी रॅलीचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम सकाळी ८ ते ९:३० वाजेपर्यंत पार पडला. पेल्हार पोलीस ठाण्याच्या परिसरात राष्ट्रीय एकतेची प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

नालासोपारा पूर्व येथील विद्या वर्धिनी हायस्कूल अँड कॉलेज आणि रेकॉन पब्लिक स्कूल अँड कॉलेजमधील विद्यार्थी आणि शिक्षक विशेष उपस्थित होते. पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सरदार पटेल यांचे योगदान आणि राष्ट्रीय एकात्मतेतील त्यांची भूमिका याबद्दल माहिती दिली. शपथविधी समारंभानंतर, रन फॉर युनिटी रॅली पेल्हार पोलिस स्टेशनपासून सुरू झाली, जी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ सर्व्हिस रोड, पेल्हार नाका, डोंगरपाडा, पेल्हार गावदेवी मंदिर आणि शिव मंदिर रोडवरून पुढे जात पोलिस स्टेशनवर परत आली. सुमारे ३ किलोमीटरच्या या रॅलीने देशभक्ती आणि एकतेच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. यावेळी, मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाने सर्व सहभागींचे हार्दिक स्वागत केले. पोलिस आयुक्त निकेत कौशिक आणि पोलिस उपायुक्त (विभाग ३) सुहास बावचे, विरार विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता आणि रॅलीमध्ये असंख्य मान्यवर उपस्थित होते. पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन कांबळे यांनी सांगितले की, सुमारे १३० ते १५० विद्यार्थी, १० शिक्षक, १० ते १५ सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, शांती मोहल्ला समितीचे सदस्य आणि पेल्हार पोलिस स्टेशनचे १२ अधिकारी आणि ४९ कर्मचारी रॅलीमध्ये सहभागी झाले होते. एकूण सहभागींची संख्या २०० हून अधिक होती. या कार्यक्रमाचा उद्देश समाजात एकता, शिस्त आणि देशभक्ती वाढवणे हा होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल पोलिस अधिकारी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# सरदार वल्लभ भाई पटेल जयंतीनिमित्त वसई पोलीस ठाण्याकडून वृक्षारोपणाने मानवंदना



**वसई : वार्ताहर**

दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ बुधवार रोजी सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या १५०व्या जयंती निमित्ताने वसई पोलीस ठाणे वसई किल्ला, मीरा मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त अंतर्गत वृक्षारोपण उपक्रम संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एच. एस. सातभाई, जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश वसई व इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत उपस्थित होते. सकाळी १० वाजता सदर उपक्रम वसई पोलिस ठाण्याच्या मागील पटांगणात एकूण ३५ विविध झाडे लावून पूर्ण करण्यात आला. वसई पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक बाळकृष्ण घाटीगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी पोलिस ठाण्यातील विविध कर्मचारी, अधिकारी वर्ग उपस्थित होते. वसई पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक बाळकृष्ण घाटीगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध पर्यावरण उपयोगी उपक्रम राबविण्यात येते आहेत. यंदा जून मध्ये त्यांनी तुंगारेश्वर पर्वतात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात योगदान दिले होते. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती ३१ ऑक्टोबर रोजी साजरी केली जाते आणि हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणूनही ओळखला जातो. वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमध्ये झाला आणि ते भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री होते. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात आणि स्वतंत्र भारताच्या एकत्रीकरणात मोलाची भूमिका बजावली, म्हणून त्यांना 'लोहपुरुष' म्हणूनही ओळखले जाते. भारतीय महिलांनी त्यांना 'सरदार' ही उपाधी दिली, जी त्यांना बारडोली सत्याग्रहातील त्यांच्या उत्कृष्ट संघटनात्मक कौशल्याबद्दल मिळाली होती. उपलब्ध माहितीनुसार यंदाच्या राष्ट्रीय एकता दिनाच्या अनोख्या सोहळ्यात गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील एकता नगर येथे भव्य संचलन आणि सांस्कृतिक महोत्सव आयोजित केला जाईल. संचलनादरम्यान, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ) आणि राज्य पोलिस दल त्यांचे कौशल्य, शिस्त आणि शौर्य प्रदर्शित करतील. या वर्षी राष्ट्रीय एकता दिनाच्या संचलनमध्ये सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ), केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), इंडो-तिबेटन बॉर्डर पोलिस (आयटीबीपी) आणि सशस्त्र सीमा दल (एसएसबी), तसेच आसाम, त्रिपुरा, ओदिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, केरळ, आंध्र प्रदेश या राज्यांचे पोलीस दल आणि राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी) यांच्या तुकड्यांचा समावेश असेल. या संचलनात घोडदळ आणि उंटांवर स्वार झालेल्या तुकड्या, तसेच देशी कुत्र्यांच्या प्रजाती आणि विविध मार्शल आर्ट्स आणि नि:शस्त्र लढाऊ कवायतींची प्रात्यक्षिके असतील.

# सरदार वल्लभभाई पटेल जयंतीदिनी पोलिसांतर्फे 'रन फॉर युनिटी'चे आयोजन




**विरार : वार्ताहर**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त आज शुक्रवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० वाजता बोळींज पोलीस ठाणे अंतर्गत परिसरात 'रन फॉर युनिटी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. पोलीस ठाणे हद्दीतील बहुतेक सामाजिक संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, शांतता मोहल्ला कमिटीचे सदस्य, विविध रिक्षा चालक मालक संघटना, पोलीस मित्र व बहुसंख्येने नागरिक यांनी यामध्ये सहभागी होऊन सक्रिय प्रतिसाद दिला. बोळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे अर्नाळा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पाटील यांनी सहभागी व उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले आहे. विरार पोलीस ठाणे अंतर्गत सुद्धा सकाळी रन फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातील मुख्य रस्त्यांवर हातात सामाजिक संदेश देणारे फलक घेऊन जनजागृती करण्यात आली. विरार पोलीस अंतर्गत गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश गायकवाड यांनी कळविले आहे. तसेच अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत सरदार वल्लभभाई पटेल यांचे १५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ह्या निमित्त अर्नाळा पोलीस ठाणे ते एसटी आगार मार्गे मच्छी मार्केट ते पारनाका, पुढे सुभाष लेन स्टॉप ते कचेरी पाडा मार्गाने पुन्हा अर्नाळा पोलीस ठाणे अशा प्रकारे तब्बल अडीच किलोमीटर अंतर रन फॉर युनिटीचे ...पान ६ वर

# 'पालघर सांसद खेळ महोत्सवात' सव्वा सहा लाख स्पर्धकांचा सहभाग




**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील तरुणांमध्ये काटकता व मेहनत करण्याची तयारी असून त्याला पौष्टिक आहार व मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. अशा होतकरू खेळाडूंच्या माध्यमातून २०३६ ऑलिम्पिक मिशनची तयारी करण्याच्या दृष्टिकोनातून पालघर मध्ये सांसद खेळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सव्वा सहा लाख पेक्षा अधिक खेळाडूंचा सहभाग होणे अपेक्षित असून जिल्ह्यातील खेळाडूं दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. २ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर दरम्यान पालघरच्या म. नी. दांडेकर हायस्कूल मैदान (संघटनात्मक खेळ), कोळगावचे पोलीस मैदान (अथलेटिक स्पर्धा), जिल्हा क्रीडा संकुल (बॅडमिंटन स्पर्धा) व लायन्स क्लब हॉल (योगा स्पर्धा) याठिकाणी आयोजन करण्यात येणार असून बहुतांश स्पर्धा या १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील मुलं व मुली तसेच खुल्या ...पान ६ वर

## फडणवीस सरकारच्या राज्यात न्याय आणि लोकशाहीचा मुडदा पडतोय!

# डॉ. संपदा मुंडे यांना मरणोत्तर न्याय मिळण्यासाठी जिल्हा काँग्रेस रस्त्यावर




**वसई : वार्ताहर**

राज्यात महायुतीच्या काळात महाराष्ट्राची वाटचाल अराजकतेकडे आणि हुकूमशाहीकडे सुरू असताना लाडकी बहीण म्हणत त्याच बहिणीचा बळी घेणारं हे बेफिकीर सरकार आहे. स्त्रीच्या स्वाभिमानासाठी आणि संरक्षणासाठी साक्षात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी स्त्रीला स्वराज्याच्या देव्हाऱ्यात प्रथम स्थान दिलं, त्या स्त्रीत्वालाच पायदळी तुडवण्याचा प्रकार महाराष्ट्रात घडत असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रुपाली चाकणकर गुन्हेगारांना पाठीशी घालून क्लीनचीट देत आहे असा घनाघाती आरोप काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव कॅप्टन निलेश पेंढारी यांनी डॉ. संपदा मुंडे यांना श्रद्धांजली वाहताना केला आहे. डॉ. संपदा मुंडे यांची आत्महत्या म्हणजे हे फार मोठे षडयंत्र लपवण्यासाठी झालेली राजकीय हत्या आहे. ज्या गोष्टी संवेदनशील आहेत, कायद्याच्या तरतुदीमध्ये आत्ताच मांडू शकत नाही, त्या गोष्टी सौ. चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन सर्वांपुढे मांडल्या व त्यानिमित्ताने डॉ. संपदा मुंडे यांच्या चारित्र्यावरच चिखलफेक करण्याचा व गुन्हेगारांना वाचवण्याचा प्रयत्न हे सरकार व सौ. रुपाली चाकणकर करत आहेत, हे स्पष्ट दिसत होते. या हत्येमागील अनेक कांगोरे स्पष्टपणे मांडताना संशयाची सुई गुन्हेगार म्हणून ह्या सरकारला आणि महिला आयोगालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करत आहे, असे लक्षात येते. त्यामुळे डॉ. संपदा मुंडे यांच्यावर चिखलफेक करून हा विषय इथेच दफन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज्य सरकारचा जाहीर निषेध आम्ही रस्त्यावर उतरून करत राहू असे सुद्धा कॅ. निलेश पेंढारी यांनी पुढे मांडले. डॉ. संपदा मुंडे यांच्यासाठी महाराष्ट्रभर होत असलेल्या युवक काँग्रेसच्या या न्याय ...पान ६ वर

# औसा-तुळजापूर महामार्गावरील नूतन रोनक सीएनजी स्टेशनचे थाटात उदघाटन



**औसा : वार्ताहर**

औसा शहरापासून तीन किमी अंतरावर असणाऱ्या वानवडा फाटा येथील नूतन रोनक सीएनजी स्टेशन या नूतन पंपाचे उदघाटन पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे सहअध्यक्ष हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते थाटात पार पडले. याप्रसंगी महानगर गॅसचे मुख्य कार्यकारी अधिकारी यज्ञेश धुरी, विष्णुदासजी अग्रवाल, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, लातूर धाराशिव महानगर गॅसचे जी.ए. मुख्य व्यवस्थापक महेश बिलगुडी, प्रोजेक्ट मॅनेजर समीर संकपाळ, अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सीए संजय अग्रवाल आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपल्या आशीर्वचनपर मनोगतात हभप. गहिनीनाथ महाराज यांनी रोनक अग्रवाल यांच्या या नूतन उपक्रमाचे कौतुक केले. काळाची गरज ओळखून त्यांनी सीएनजी पंपाची उभारणी केल्याचे त्यांनी नमूद केले. ...पान ६ वर